

# जातक कथा 3

धर्मानंद कोसंबी



## ३६. अकिंचनाला भय कोठून.

(असंकिय जातक नं. ७६)

एकदां आमचा बोधिसत्त्व ब्राह्मणकुलांत जन्मला होता. वयांत आल्यावर प्रापंचित सुखें त्याज्य वाटून त्यानें हिमालयावर तपश्चर्या आरंभिली. पुष्कळ काळपर्यंत फलमूलांवर निर्वाह केल्यावर खारट आणि आंबट पदार्थ खाण्यासाठीं लोकवस्तींत जावें या उद्देशानें तो तेथून निघाला. वाटेंत त्याला कारवानांचा तांडा सांपडला. त्यांच्या बरोबरच तो मार्गक्रमण करूं लागला. रात्रीं एका ठिकाणीं मुक्कामाला उतरले असतां त्या व्यापाऱ्यांना लुटण्यासाठीं पुष्कळ चोर जमा होऊन व्यापारी निजल्यावर लुटावें अशा उद्देशानें आसपास दबा धरून राहिले. बोधिसत्त्व एका झाडाखालीं इकडून तिकडे फिरत होता. सगळे व्यापारी झोंपी गेल्यावर चोर हळू हळू जवळ येऊं लागले. त्यांची चाहूल ऐकून बोधिसत्त्व तसाच फेऱ्या घालीत राहिला. चोर तिकडे वाट पहात बसले होते. हा तपस्वी निजणार व या तांड्याला आम्ही लुटणार, अशा बेतानें चोरांनीं ती सारी रात्र घालविली परंतु आमचा बोधिसत्त्व झोंपीं न जातां सारी रात्र फेऱ्या घालीत जागृत राहिला. पहांटेला चोर आपली हत्यारें तेथेंच टाकून पळत सुटले, व जातां जातां मोठ्यानें ओरडून म्हणाले, "निष्काळजी व्यापाऱ्यांनों, हा तपस्वी तुमच्या बरोबर नसता तर आजच तुमचे घडे भरले असते !"

व्यापारी चोरांच्या आरोळ्यांनीं जागे होऊन पहातात तों त्यांना चोरांनीं टांकून दिलेलीं शस्त्रास्त्रें आढळून आलीं. ते बोधिसत्त्वाला म्हणाले, "सारी रात्र चोर तुमच्या आसपास दबा धरून बसले असतां, व ते तुमच्यावर हल्ला करतील असा संभव असतां तुम्ही भिऊन आरडाओरडा केली नाहीं हें कसें !"

बोधिसत्त्व म्हणाला, "गृहस्थहो, जेथें संपत्ति आहे तेथें भय आहे. माझ्यासारख्याला भय मुळींच नाहीं, गांवांत किंवा अरण्यांत कोणत्याही प्राण्याची मला भीति वाटत नाहीं. कां कीं, मैत्री आणि करुणा यांची मी सतत भावना करीत असतों."

## ३७. डामडौलानें यश मिळत नाहीं.

(भीमसेन जातक नं. ८०)

एकदां आमचा बोधिसत्त्व औदिच्य ब्राह्मणकुलांत जन्मला होता. लहानपणीं धनुर्विद्येचा त्याला फार नाद असे. वयांत आल्यावर तक्षशिलेला जाऊन एका मोठ्या प्रसिद्ध आचार्यापाशीं त्यानें युद्धकलेचें आणि वेदाचें उत्तम ज्ञान संपादिलें. बोधिसत्त्व या जन्मीं जरा ठेंगू होता, व पुढल्या बाजूला वांकलेला होता. त्यामुळें त्याला छोटा धनुग्राहपंडित असें म्हणत असत. गुरुगृहीं शिल्पकलेचें अध्ययन करून झाल्यावर त्यानें असा विचार केला कीं, मी जर कोणत्याहि राजापाशीं माझ्या उपजीविकेसाठीं गेलों, तर माझें ठेंगू शरीर पाहून त्या राजाचा विश्वास मजवर बसणार नाहीं, तो म्हणेल कीं, अशा ठेंगू शरीरानें तूं काय पराक्रम करणार आहेस. तेव्हां दुसऱ्या कांहीं उपायानें आपली उपजीविका केली पाहिजे. एके दिवशीं बोधिसत्त्व चांगला एक धट्टाकट्टा मनुष्य मिळविण्याच्या उद्देशानें फिरत असतां त्याला भीमसेन नांवाचा एक कोष्टी आढळला. नांवाप्रमाणेंच त्याचें शरीर होतें. त्याला पाहून बोधिसत्त्व म्हणाला. "तुझें नांव काय ?"

कोष्टी म्हणाला, "माझें नांव भीमसेन."

बोधिसत्त्व म्हणाला, "तुझें नांव व शरीर हीं दोन्हीं इतकीं चांगली असतां तूं हा कोष्ट्याचा धंदा कां पत्करलास ?"

कोष्टी म्हणाला, "काय करावें ! याशिवाय दुसरी कोणतीच कला मला माहीत नाही."

बोधिसत्त्व म्हणाला, "माझें जर ऐकशील तर उपजीविकेचा उत्तम मार्ग मी तुला दाखवून देईन. या साऱ्या जंबुद्वीपांत माझ्यासारखा धनुर्विद्याकुशल असा दुसरा माणूस नाहीं. परंतु माझ्या या ऱ्हस्व देहामुळें राजाद्वारीं जाऊन राजाश्रय मागण्याची मला छाती होत नाहीं. पण तुला पुढें करून राजाजवळ गेलों असतां तुझ्या भक्कम शरीरावर राजाचा तेव्हांच विश्वास बसेल, मला तूं आपला मदतनीस म्हणून ठेवून घे, व आपण स्वतः मोठा धनुर्विद्या निष्णात आहे असें राजाला सांग. प्रसंग पडलाच तर मी आपल्या कौशल्यानें राजाचें समाधान करीन."

ही गोष्ट भीमसेनाला पसंत पडली. ते दोघे वाराणसीच्या राजाला भेटले. राजानें भीमसेनाच्या शरीरावर प्रसन्न होऊन दरमहा दोन हजार कार्षापण वेतन देऊन आपल्या पदरी ठेऊन घेतलें.

बोधिसत्त्व भीमसेनाचा मदतनीस म्हणून राहिला. एके दिवशीं एका दांडग्या वाघानें जंगलांतील रस्ता ओसाड पाडला अशी बातमी आली. तेव्हां राजानें वाघाला मारण्याच्या कामीं भीमसेनाची योजना केली. बिचारा भीमसेन वाघाचें नांव ऐकल्याबरोबर गांगरून गेला! व बोधिसत्त्वाला म्हणाला, "पंडिता, आतां या संकटांतून पार पाडण्यासाठीं तुलाच मजबरोबर गेलें पाहिजे."

बोधिसत्त्व म्हणाला, "माझ्या जाण्याचें प्रयोजन दिसत नाहीं. हें काम तुलाच करितां येण्यासारखें आहे."

भीमसेन म्हणाला, "पण गृहस्था, वाघ पाहिल्याबरोबर माझी गाळण उडून जाईल ! आजन्मांत मी वाघाची शिकार केली नाहीं. आणि आतां तूं मला एकटा पाठवून फजिती करूं पाहतोस कीं काय ? किंवा माझ्यापेक्षांदेखील तूं भितरा आहेस ?"

बोधिसत्त्व म्हणाला, "तुझ्या शंका व्यर्थ आहेत. वाघाची शिकार करणें मोठेंसें काम नाहीं. मी तुला एक लहानशी युक्ति सांगतों. तिच्यायोगें वाघ आपोआप मारला जाईल, व सगळें श्रेय मात्र तुला मिळेल. ज्या अरण्यांत वाघ आहे त्याच्या आसपासचे कांहीं धनुर्ग्राहक लोकांना घेऊन तूं वाघाला मारण्यासाठीं जा, आणि झुडुपांतून वाघ बाहेर पडल्याबरोबर एका झाडाचा आश्रय करून दडून बस. ते ग्रामवासी लोकच त्या वाघाला ठार मारतील. जेव्हां वाघ मेल्याची ओरड होईल तेव्हां जंगलांतील एक बळकट वेल तोडून पुढें हो, व त्या लोकांना म्हण कीं, तुम्हीं हा वाघ कोणाच्या हुकुमानें मारला. मी या वाघाला जिवंत बांधून राजाजवळ नेण्यासाठीं जंगलांत शिरलों असतां तुम्हीं एकाएकीं या वाघाला बाण मारलात, हें योग्य केलें नाहीं. ते लोक घाबरून जाऊन चूक झाल्याबद्दल तुमची क्षमा मागतील. आणि राजाला आपला अपराध न कळविण्याबद्दल तुम्हाला कांहीं पारितोषिकहि देतील."

बोधिसत्त्वानें शिकविल्याप्रमाणें भीमसेनानें सर्व कांहीं केलें, व वाघ मारल्याचें श्रेय मिळविलें. पुढें अशाच एका अरण्यांत गवा उठला होता. त्यानें तो मार्ग ओस पडला. राजाच्या कानीं लोकांची कागाळी आल्यावर राजानें भीमसेनाची गव्याला मारण्याच्या कामीं नेमणूक केली. तेव्हां पहिल्याच युक्तीनें भीमसेनानें तिकडे लोकांना फसवून व इकडे आपणच गवा मारिला असें सांगून राजाकडून पुनः बक्षिस मिळविलें, व तो गर्वानें इतका फुगून गेला कीं, आपण बोधिसत्त्वापेक्षां पुष्कळ पटीनें शूर आहों असें त्यास वाटूं लागलें.

कांहीं काळ लोटल्यावर त्या राज्यावर दुसरा एक राजा स्वारी करून आला. राजानें भीमसेनाची परराज्याचा पराभव करण्यासाठीं सेनापतीच्या जागीं नेमणूक केली. तेव्हां बोधिसत्त्वाला न विचारतां शस्त्रास्त्रांनी सज्ज होऊन आणि हत्तीच्या अंबारींत बसून सर्व सैन्यासहवर्तमान तो शत्रूवर चाल करून गेला. बोधिसत्त्वाला त्याचें शौर्य माहीत होतें. आजपर्यंत राजाचें आपण अन्न खाल्लें, व या प्रसंगी राजाला मदत न करिता भीमसेनाच्या भरंवशावर राहिल्यास पुढें काय गती होणार हें तो जाणून होता. म्हणून तो भीमसेनाच्या अवज्ञेला न जुमानितां त्याच्या मागें अंबारींत बसून युद्धभूमीवर गेला.

परसेना पाहिल्याबरोबर भीमसेनाला घाम सुटला; शरीर कांपायला लागलें; व तेथल्या तेथेंच त्यानें देहधर्म केला ! बोधिसत्त्वाने त्याला सांवरून धरिलें नसतें तर तो हत्तीच्या पाठीवरून

खालीच पडला असता. ही त्याची दुर्दशा पाहून बोधिसत्त्व त्याला म्हणाला, "नुकताच तूं मोठ्या शौर्याच्या गोष्टी सांगत होतास ! माझी देखील तूं गर्वानें अंध होऊन अवज्ञा केलीस ! आणि आतां तुझी अशी दुर्दशा कां व्हावी ? तुझ्या बोलण्यांत आणि कृतींत किती फरक आहे बरें !"

भीमसेन म्हणाला, "झालेली गोष्ट होऊन गेली. पण या प्रसंगीं मलाच नव्हे, तर या सर्व सेनेला आणि आमच्या राजाला संकटांतून पार पाडणारा तुजवांचून दुसरा कोणीच नाहीं. आतां माझ्या अपराधाची क्षमा करून आम्हां सर्वांना जीवदान दे."

बोधिसत्त्वानें त्याला हत्तीवरून खालीं उतरविलें; स्नान वगैरे घालून दुसरे कपडे देवविले; व स्वतः सेनाधिपत्य स्वीकारून तो युद्धाला पुढें सरसांवला. बोधिसत्त्व युद्धकलेंत अत्यंत निपुण असल्यामुळें परराजाचा पराभव करण्यास त्याला आयास पडले नाहींत. एवढेंच नव्हे, त्यानें त्या राजाला जिवंत पकडून आपल्या राजासमोर नेलें. त्यावेळीं राजाला बोधिसत्त्वाची खरी किंमत समजली. राजानें त्याचा बहुमान केला, व सेनापति पदावर त्याची कायमची नेमणूक केली. बोधिसत्त्व तेव्हांपासून सर्व जंबुद्वीपांत छोटा धनुर्ग्राहपंडित या नांवानें प्रसिद्धीस आला. त्यानें भीमसेनाचा त्याग न करितां मरेपर्यंत त्याला उदरनिर्वाहापुरतें वेतन दिलें.

३८. काडीचा प्रामाणिकपणा.

(कुहक जातक नं. ८९)

अतीत कालीं एका गांवीं एक जटिल तापस रहात असे. त्याच्या एका गृहस्थ शिष्याच्या घरीं तो वारंवार भिक्षेसाठीं येत असे. त्या गुहस्थानें त्याला जवळच्या जंगलांत एक प्रशस्थ पर्णकुटिका बांधवून दिली होती. त्या गृहस्थाचा त्याच्यावर इतका विश्वास होता कीं त्याला तो जीवन्मुक्त समजत असे. त्या गांवांच्या आसपास बऱ्याच चोऱ्या होऊं लागल्या; तेव्हां गृहस्थानें आपल्याजवळ असलेल्या शंभर मोहरा त्या जटिलाच्या पर्णशाळेंत जाऊन तिसऱ्या कोणाला कळूं न देतां जमिनींत गाडून टाकिल्या; व तो जटिलाला म्हणाला,"भदंत, माझ्याजवळ असलेलें सर्व धन या येथें मीं पुरलें आहे. त्याचा सांभाळ करा."

जटिल म्हणाला, "हें तुझें बोलणें योग्य नाहीं. कारण मला दुसऱ्याच्या धनाचा लोभ नाहीं व तुझी माझीं मैत्री असल्यामुळें ही गोष्ट दुसऱ्याला कळविणें उचित होणार नाहीं."

जटिलाला नमस्कार करून तो गृहस्थ आपल्या घरीं गेला. कांहीं दिवस गेल्यावर जटिलानें असा विचार केला कीं, "मी या शंभर मोहरा घेऊन दुसऱ्या गांवीं गेलों तर मला सुखानें उपजीविका करतां येईल." त्यानें तें द्रव्य दुसऱ्या एका ठिकाणीं गाडून ठेविलें व भिक्षेसाठीं तो त्या गृहस्थाच्या घरीं गेला. तेथें गृहस्थानें त्याचें आदरातिथ्य चांगलें करून त्याला जेवावयास घातलें. भोजनोत्तर जटिल म्हणाला, "मी कांहीं दिवसासाठीं दुसऱ्या एका गांवीं जाणार आहें. चिरकाल एकाच ठिकाणीं राहिल्यामुळें तपस्व्याला त्या ठिकाणाचा लोभ जडतो. पण अशा लोभांत गुरफटून जाणे आम्हा लोकांना योग्य नाहीं. म्हणून कांहीं दिवस स्थानांतर करून मी परत येईन. तोपर्यंत तुम्ही आपली पर्णशाला संभाळा."

बिचाऱ्या गृहस्थाला आपला गुरु परगांवी जातो म्हणून फार वाईट वाटलें. तो त्या जटिलाला कांहीं अंतरावर पोंचवून परत घरीं आला.

त्या दिवशीं आमचा बोधिसत्त्व व्यापारासाठीं गांवोगांवीं हिंडत असतां त्या गृहस्थाकडे पाहुणा म्हणून उतरला होता. त्या गृहस्थानें माघारें येऊन बोधिसत्त्वापाशीं आपल्या गुरूची फार वाखाणणी केली. जटिलहि मोठा धूर्त होता. आपल्या मागोमाग जाऊन गृहस्थ आपलें द्रव्य उकरून पाहील, व तें न दिसल्यामुळें आपणाला वाटेंत पकडील असा त्याला संशय आला. आपल्यावरची त्या गृहस्थाची श्रद्धा वाढावी आणि दोन तीन दिवस तरी त्यानें आपल्या द्रव्याच्या वाटेला जाऊं नये अशा उद्देशानें तो पुनः त्या गृहस्थाच्या घरीं गेला. त्याला पाहून गृहस्थ म्हणाला, "भदंत, आपण इतक्या दुरून परत आलांत हें काय ?"

जटिल म्हणाला, "तुमच्या घरची गवताची काडी माझ्या जटेंत अडकून राहिली, ती परत करण्यासाठीं मी येथें आलों आहें."

गृहस्थ म्हणाला, "या यःकश्चित कामासाठीं आपण एवढीं तसदी व्यर्थ घेतली. एका गवताच्या काडीनें आमचें काय होणार आहे ? बरें जर आपल्या शीलाचा भंग होईल असें आपणास वाटत असेल तर ती येथेंच फेंकून द्या म्हणजे झालें." जटिलानें गवताची काडी फेंकून दिली, व तो चालता झाला.

बोधिसत्त्व त्याचें भाषण ऐकत होता व तापसानें काडी फेकून दिली हा प्रकारहि त्यानें पाहिला. तो (जटिल ?) म्हणाला, "हा तपस्वी मोठा लबाड दिसतो. मला अशी शंका येते कीं तुम्ही कांही तरी द्रव्य त्याच्या स्वाधीन केलें असावें व तो तें उपटण्याचा प्रयत्न करीत असावा."

गृहस्थ म्हणाला, "मी शंभर मोहरा याच्या पर्णकुटिकेंत गाडून ठेविल्या आहेत, एवढेंच काय तें. याशिवाय याला मी दुसरें कांहीं दिलें नाहीं."

बोधिसत्त्व म्हणाला, "तर मग तुम्ही आतांच्या आतां आपल्या मोहरांचा शोध करा आणि जर त्या तेथें सांपडल्या नाहींत तर या लुच्चा तपस्व्यानें त्या लांबवल्या असल्या पाहिजेत असें खास समजा."

त्या गृहस्थानें जटिलाच्या पर्णकुटिकेंत धांव घेतली, व तो पाहतो तों मोहरा पुरलेल्या ठिकाणांतून नाहींशा झाल्या आहेत. तेव्हां त्यानें त्या जटिलाला दुसऱ्या गांवी जात असतां वाटेंत आडवून पकडून आणलें. तेव्हां बोधिसत्त्वासमोर जटिलानें आपला गुन्हा कबूल केला; व दुसऱ्या ठिकाणीं गाडून ठेविलेल्या मोहरा त्या गृहस्थाच्या स्वाधीन केल्या.

तेव्हां बोधिसत्त्व म्हणाला, "गवताच्या काडीचा प्रामाणिकपणा दाखवीत असतां तूं गोड गोड बोलून त्या गृहस्थाला ठकविलेंस. परंतु शंभर मोहरा चोरण्याला तुला मुळींच लाज वाटली नाहीं ! पुनः अशा तऱ्हेचें पापकृत्य करून व वरून दांभिकपणा दाखवून लोकांना फसवूं नकोस."

गवताच्या काडीबद्दल जे प्रामाणिकपणा दाखवितात त्यांना मोठी चोरी करण्यास लाज वाटणार नाहीं असें खास समजावें.

३९. निवाडा करण्यांत चातुर्यच पाहिजे.

(महासार जातक नं. ९२)

आमचा बोधिसत्त्व एका जन्मीं वाराणसीच्या राजाचा अमात्य झाला होता. एके दिवशीं राजा आपल्या अंतःपुरांतील स्त्रियांसह उद्यानक्रीडेसाठीं गेला होता. तेथें तो व त्याच्या स्त्रिया तलावांत स्नान करण्यास गेल्या. त्या स्त्रियांनीं आपापले अलंकार काढून उपवस्त्रांत बांधून दासींच्या स्वाधीन केले; व त्या तलावांत उतरल्या. त्यांतील एक दासी अलंकार खालीं ठेवून इकडे तिकडे पहात बसली होती. कांहीं वेळानें ती डुलक्या घेऊं लागली. त्या उद्यानांत पुष्कळ वानर रहात असत. त्यांतील एका वानरीनें त्या दासीच्या जवळ असलेलें अलंकारांचें गांठाडें पाहिलें व ती दासी बेसावध आहे असें पाहून मर्कटीला गांठोड्यांत काय आहे हें पाहण्याची फार उत्सुकता झालीं. खालीं उतरून हळूंच गांठोडें सोडून त्यांतील एक बहुमोल मोत्यांचा हार घेऊन ती मर्कटी तेथून पार पळून गेली, व एका वृक्षाच्या वळचणींत तो हार दडवून ठेवून जणूं काय आपणाला कांहीं माहीत नाहीं असें मिष करून तेथेंच बसून राहिली.

इकडे दासी जागी होऊन पहाते तो गांठोडें सोडलेलें व मुक्ताहार चोरीस गेलेला ! आपल्या जिवावरचें संकट आहे असें जाणून तिनें एकच आरडाओरड केली. इतर दासी व राजस्त्रियाहि तेथें जमा झाल्या व तिला त्यांनीं आरडाओरड करण्याचें कारण विचारिलें. तेव्हां भयचकित होऊन ती म्हणाली, "माझ्या मागोमाग कोणी मनुष्य येऊन या गांठोड्यांतील हार घेऊन पळून गेला. त्याच्यामागें धांवण्याचें सामर्थ्य नसल्यामुळें मी ओरडलें.

राजाला हें वर्तमान समजल्याबरोबर त्यानें उद्यानपालांना बोलावून चोराचा पत्ता लावण्यास हुकूम केला. ते इतस्ततः पळत सुटले. एक ग्रामवासी मनुष्य त्या उद्यानाजवळील रस्त्यानें चालला होता. पोलीस धांवत सुटलेले पाहून बिचारा घाबरून गेला, व आडवाटेनें पळूं लागला. पोलिसांनीं त्याला ताबडतोब पकडिलें, व यथेच्छ मार दिला. पोलिसांच्या तावडींतून सुटण्याचा दुसरा मार्ग न दिसल्यामुळें त्यानें मुक्तहार चोरण्याचा गुन्हा कबूल केला, व तो म्हणाला, "मला या मुक्तहाराची किंमत काय ठाऊक. मी तो नेऊन नगरश्रेष्ठीला दिला."

पोलिसांनीं चोराला राजासमोर नेलें, व त्यानें तेथेंहि आपला गुन्हा कबूल करून पूर्ववत् हकीकत सांगितली. तेव्हां राजानें नगरश्रेष्ठीला पकडून आणण्याचा हुकूम फर्माविला; व आपल्यासमोर आल्यावर राजा त्याला म्हणाला, "माझ्या राजवाड्यांतला हार तूं क्षुद्र माणसाकडून घेतलास कसा ?

श्रेष्ठीला राजाच्या या बोलण्याचा अर्थच समजेना. तो घोटाळयांत पडला तेव्हां राजानें त्या गांवढळ मनुष्याकडून सर्व गुन्हा पुनः वदविला. श्रेष्ठीला या संकटांतून पार पडण्याची आशा राहिली नाहीं. आपण हार घेतला नाहीं असें म्हणण्यांत कांहीं अर्थ नाहीं, असें वाटून तो म्हणाला, "महाराज, या माणसापासून मी मुक्तहार घेतला खरा. पण तो आपल्या पुरोहिताच्या स्वाधीन तेव्हांच्या तेव्हांच करण्यांत आला."

राजानें आपल्या नोकरांला पाठवून पुरोहिताला तेथें आणिलें. तो पहिल्यानें घोटाळयांत पडला खरा. पण आपल्यासमक्ष श्रेष्ठी हार आपल्या स्वाधीन केला असें म्हणतो, तेव्हा गुन्हा नाकबूल करण्यापासून कांहीं फायदा होणार नाहीं असें जाणून तो म्हणाला, "महाराज श्रेष्ठीनें मला हार दिला खरा पण तो मजपाशीं राहिला नाहीं. मी तो आपल्या दरबारच्या गवयाला देऊन टाकिला."

झालें ! बिचाऱ्या गवयावर पाळी आली ! पुरोहितासारखा साक्षीदार असतांना गुन्हा नाकबूल करण्यांत अर्थ काय ? त्यानें सांगितलें कीं, "मी पुरोहित महाराजापासून मुक्तहार घेतला खरा पण तो दरबारच्या दासीला देऊन टाकला."

या चौकशीच्या गडबडीत संध्याकाळ झाली. तेव्हां राजा म्हणाला, "सध्यां या पांच जणांला अटकेंत ठेवा. उद्यां यांची चौकशी करितां येईल."

बोधिसत्त्व राजाच्या जवळच होता. तो म्हणाला, "महाराज, आपण या पांच इसमांला माझ्या स्वाधीन करा. मी या खटल्याची चौकशी करतों."

राजाला बोधिसत्त्वच या कामीं योग्य वाटला, व त्यानें हा खटला निवडण्याचें काम बोधिसत्त्वावर सोंपविलें. बोधिसत्त्वानें या पांचजणांला एका ठिकाणीं अटकेंत ठेविलें व ते काय बोलतात हें ऐकण्यासाठीं त्या स्थानाच्या आसपास आपल्या गुप्त हेरांची योजना केली. रात्रीं सामसूम झाल्यावर श्रेष्ठी या गांवढळ मनुष्याला म्हणाला, "अरे मूर्खा, तूं मला साऱ्या जन्मांत कधीं पाहिलें होतेंस काय ? मग माझ्याजवळ दागिना दिला असें खोटें कां बोललास ?"

"श्रेष्ठी महाराज, माझ्यासारख्या गांवढळ मनुष्यानें चांगला मंचक सुध्दां कधीं पाहिला नाहीं व मग मोत्याचा हार कोठून पाहिला असणार ! परंतु माराच्या भयानें, व कशीतरी माझी सुटका व्हावी या उद्देशानें मी आपलें नांव सांगितलें. मेहेरबानगीकरून माझ्यावर रागावूं नका."

इतक्यांत पुरोहित श्रेष्ठीला म्हणाला, "अहो महाश्रेष्ठी ? तुम्ही माझ्यावर हा भलताच आळ कां म्हणून घातलात ?"

श्रेष्ठी म्हणाला, "आम्ही दोघेही वजनदार पडलों तेव्हां एका ठिकाणीं राहिल्यानें दोघांचीहि लवकर सुटका होईल अशा कल्पनेनें मी आपणाला देखील या खटल्यांत ओढलें. याबद्दल क्षमा असावी."

तेव्हां गवई म्हणाला, "पण हे ब्राह्मणा, तूं माझ्याजवळ दागिना कधीं दिलास ?"

पुरोहित म्हणाला, "आमच्याजवळ तूं असलास तर आमची करमणूक करूं शकशील व त्यामुळें कैदेंत देखील सुखानें काळ घालवितां येईल म्हणून तुलाहि मीं या माळें गोविलें."

दासी म्हणाली, "अहो दुष्ट गवईबुवा, तुमची आणि माझी ओळख तरी आहे काय ? मला तुम्ही दागिना दिलात कधीं ?"

गवई म्हणाला, "बाई रागावूं नकोस. आम्हा चौघांबरोबर, तूं असलीस म्हणजे आमच्या सेवेंत अंतर पडणार नाहीं. एवढ्याचसाठीं मीं तुझें नांव सांगितलें."

बोधिसत्त्वाच्या गुप्त हेरांनीं हा सर्व संवाद ऐकून घेतला, व बोधिसत्त्वाला कळविला. बोधिसत्त्वाची हे लोक निरपराधी असल्याबद्दल आगाऊच खात्री होऊन चुकली होती. कां कीं उद्यानाच्या बाहेर असलेल्या माणसाच्या हातीं पहारेकऱ्यांच्या तावडींतून सुटून एखादा दागिना जाणें असंभवनीय होतें. त्यांत बोधिसत्त्वाला या संवादाचा बळकट पुरावा सांपडला. परंतु चोरीचा थांग लावल्याशिवाय हें वर्तमान राजाला कळविणें इष्ट नव्हतें. तेव्हां बोधिसत्त्वानें विचाराअंती एखाद्या वानरीनें मुक्तहार चोरला असावा असें अनुमान केलें व दुसरें दिवशीं प्रतीति पाहण्यासाठीं खोटे दागिने करवून ते त्या उद्यानांत आपल्या विश्वासू नोकरांकडून पसरविले. प्रत्येक वानरीनें एकेक दागिना उचलून आपल्या गळयांत घातला, व त्या इकडून तिकडून मिरवूं लागल्या. ज्या वानरीला मुक्तहार सांपडला होता तिनें मात्र त्यांतील दागिना घेतला नाहीं. तेव्हां त्या इतर वानरी तिच्याजवळ जाऊन तिला म्हणाल्या, "काय तूं येथें आळशासारखी बसली आहेस. हे पहा आमचे अलंकार !"

ती वानरी स्पर्धेनें म्हणाली, "असले घाणेरडे दागिने घेऊन काय करावयाचे आहेत ? मजपाशीं जो दागिना आहे तो पाहिला तर तुम्हांला असले भिकारडे दागिने घालून मिरविण्यास लाजच वाटेल." असें म्हणून तिनें वळचणींतुन मुक्तहार बाहेर काढला, व आपल्या गळयांत घालून त्या सर्व मर्कटीसमोर मोठ्या डौलानें इकडून तिकडे मिरवूं लागली.

बोधिसत्त्वानें दागिने घेऊन वानरी काय करतात हें पाहण्यासाठीं आपले हेर तेथे ठेविलेच होते. त्यांनीं मुक्तहार वानरीच्या गळयांत पाहिल्याबरोबर तिला घेरलें. बिचारी मर्कटी त्यांच्या शस्त्रास्त्रांनी आणि आरडाओरडीनें घाबरून गेली, व तिनें तो हार तेथेंच जमिनीवर फेकून देऊन पळ काढिला. त्या हेरांनीं तो हार बोधिसत्त्वाकडे नेला, व त्यानें तो राजाला दिला. राजानें सर्व वृत्तांत ऐकून घेऊन बोधिसत्त्वाची फार तारीफ केली व तो म्हणाला, "संग्रामात * शूराची योजना करावी; मंत्री मंडळांत जो मंत्राचा भेद करणार नाहीं अशाचीच योजना करावी; जेवण्याखाण्यांत आवडत्या माणसांना आमंत्रण करावें; पण अत्यंत कठीण प्रसंगी शहाण्याचीच योजना करावी असें जें लोक म्हणत असतात तें खोटें नाहीं. आज तुझ्याच पांडित्यानें चोरीचा पत्ता लागून निरपराधी माणसांचा माझ्याकडून छळ झाला नाहीं."

---------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

* मूळ गाथा -

उक्कट्ठे सूरमिच्छन्ति मन्तीसु अकुतूहलं ।

प्रियं च अन्नपानह्मि अत्थे जाते च पण्डितं ॥

---------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

याप्रमाणें बोधिसत्त्वाची स्तुती करून राजानें त्याला मोठें बक्षीस दिलें व आजन्म त्याच्या सल्ल्यानें दानधर्मादिक सत्कृत्यें करून पुष्कळ कीर्ति मिळविली.

४०. नांवाची फारशी किंमत नाहीं.

(नामसिद्धि जातक नं. ९७)

एका जन्मीं आमचा बोधिसत्त्व तक्षशिला नगरींत प्रसिद्ध आचार्य होऊन पांचशें शिष्यांना वेद पढवीत असे. त्यांतील एकाचें नांव पापक असें होतें. "कायरे पाप्या, इकडे येरे पाप्या" असें लोक त्याला म्हणत असत. त्यामुळें कंटाळून जाऊन तो आपल्या गुरूला म्हणजे बोधिसत्त्वाला म्हणाला, "गुरुजी, माझें नांव मला अमंगल वाटतें. दुसरें एखादें मला चांगलेसें नांव द्या."

बोधिसत्त्व म्हणाला, "येथल्या येथेंच चांगलें नांव घेण्यापेक्षां देशपर्यटन करून एखादें चांगलें नांव पाहून ये, व मला सांग, म्हणजे आम्ही सर्वजण त्याच नांवानें तुला हांक मारीत जाऊं."

दुसऱ्या दिवशीं पापकानें शिदोरी सज्ज करून दुसऱ्या गांवचा रस्ता धरला. व ज्याच्या त्याच्या नांवाचा अर्थ पहात जाऊं लागला. वाटेंत एका शहराजवह आला असतां कांहीं लोक प्रेत घेऊन स्मशानयात्रेला चालले होते. तेव्हां पापक म्हणाला, "कायहो इतकी मंडळी कोणीकडे चालली ?"

ते लोक म्हणाले, "जीवक नांवाचा आमचा एक दोस्त नुकताच मरण पावला. त्याच्या अंत्यविधीला आम्हीं जात आहों." "पण कायहो ! जीवक मरतो हें कसे ?"

"जीवक असो अथवा अजीवक असो, मनुष्य म्हटला कीं तो मरावयाचाच. नांवानें मरण चुकतें असें नाहीं. व्यवहारापुरताच काय तो नांवाचा उपयोग. तूं अगदींच खुळा दिसतोस !" असें त्यांनीं उत्तर दिलें.

बिचारा पापक चांगल्या नांवाचा हा विपर्यास पाहून विस्मित होऊन गेला, व तसाच पुढें जातो तों एका दासीला वेळेवर काम करीत नाहीं, म्हणून तिचे मालक रस्त्यावर चाबकानें मारीत होते. तो त्याला म्हणाला, "या बाईचें नांव काय, व हिला तुम्ही कां मारितां ?"

ते म्हणाले, "इचें नांव धनपाली व वेळेवर काम करीत नसल्यामुळें हिला आम्हीं दंड करीत आहों."

"अहो पण धनपालीवर दुसऱ्याचें काम करण्याचा प्रसंग यावा कसा ?"

"अहो तुम्ही हें मूर्खासारखें काय विचारितां ? ही जन्माचीच दासी आहे. धनपाली असें नांव ठेविलें म्हणून काय झालें ? धनपाली असूं द्या किंवा अधनपाली असूं द्या. दारिद्र्य यावयाचें असलें तर तें आल्यावांचून रहात नाहीं. नांवानें कोणताच कार्यभाग व्हावयाचा नाहीं, तें केवळ व्यवहारापुरतें आहे ही गोष्ट तुम्हाला माहीत नसावी, हें मोठें आश्चर्य आहे."

बिचारा पापक चांगल्या नांवाच्या मंगलत्वाविषयीं जवळ जवळ निराश होऊन तसाच पुढें चालला. शहराच्या बाहेर गेल्यावर कांहीं अंतरावर इकडे तिकडे फिरणारा एक गृहस्थ त्याच्या पाहण्यांत आला. पापकानें त्याला त्याचें नांव विचारिलें, तेव्हां तो म्हणाला, "माझें नांव पंथक (वाटाड्या)."

"तर मग तुम्ही या निर्जन प्रदेशांत काय करितां ?" मी वाट चुकल्यामुळें इतस्ततः भटकत आहें. मला अद्यापि माझा मार्ग सांपडला नाहीं."

"पण पंथक (वाटाड्या) वाट चुकतो हें कसे ? आहो हें केवळ नांव आहे. वाट चुकण्याचा आणि याचा कांहींच संबंध नाहीं. तुम्हीं नांवावर भरंवसा ठेवणारे वेडगळ मनुष्य दिसतां !"

पापक चांगल्या नांवाच्या गुणांविषयीं पूर्ण निराश झाला व आपलें नांव बदलण्याचा बेत त्यानें रहित केला. तेथून आपल्या गुरूजवळ जाऊन घडलेलें सर्व वर्तमान त्यानें त्याला निवेदन केलें. त्याच्या सोबत्यांनीं पापकानें कोणतें नांव शोधून आणलें आहे असा बोधिसत्त्वाला प्रश्न केला. तेव्हां तो त्याला म्हणाला "जीवक मरतो, धनपालीला दारिद्र्य येतें, व पंथक वाट चुकतो, हें पाहून आमचा पापक चांगल्या नांवाचा थांग लागल्यावाचून परत आला.*" पापकाचें तेंच नांव कायम राहिलें हें निराळें सांगावयास नकोच.

--------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

* मूळ गाथा--

जीवकं च मतं दिस्वा धनपालिं च दुग्गतं ।

पन्थकं च मने मूळहं पापको पुनरागतो ॥

--------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

४१. अतिपांडित्याचा परिणाम.

(कूटवाणिज जातक नं. ९८)

एकदां बोधिसत्त्व वाराणसी नगरींत वणिजकुलांत जन्मला होता. त्याला पंडित हें नांव ठेवण्यांत आलें. दुसरा एक अतिपंडित नांवाचा समानवयस्क गृहस्थ वाराणसींत रहात होता. वयांत आल्यावर बोधिसत्त्वानें त्याचा भागीदार होऊन उद्योग धंदा करण्यास सुरुवात केली. त्यांत त्या

दोघांना बराच फायदा झाला परंतु फायद्याची वांटणी करण्याची वेळ आली, तेव्हां अतिपंडित म्हणाला, "मला दोन हिस्से मिळाले पाहिजेत, व तुला एक हिस्सा मिळाला पाहिजे."

बोधिसत्त्व म्हणाला, "हें कसें ! आम्हा दोघांचेंहि भांडवल सारखेंच होतें. दोघांनींहि सारखीच मेहनत केली आहे, मग तुला दोन हिस्से, आणि मला एक हिस्सा काय म्हणून ?"

अतिपंडित म्हणाला, "बाबारे, माझ्या नांवाची किंमत केवढी मोठी आहे हें पहा. तूं केवळ पंडित आहेस, आणि मी अतिपंडित आहे; व यासाठींच मला दोन हिस्से मिळणें रास्त आहे."

अतिपंडिताच्या या तर्कवादानें बोधिसत्त्वाचें समाधान झालें नाहीं. तेव्हां अतिपंडितानें त्याची समजूत घालण्याची दुसरी एक युक्ति शोधून काढली. तो म्हणाला "बा पंडिता, तुला जर माझें म्हणणें पटत नसेल तर आपण उद्यां या गांवाजवळ प्रसिद्ध असलेल्या एका वृक्षदेवतेजवळ जाऊं, व तिला आम्हा दोघांचेंहि म्हणणें काय आहे तें कळवूं ; आणि ती जसा निवाडा करील त्याप्रमाणें वागूं."

दुसऱ्या दिवशीं अतिपंडितानें आपल्या वृद्ध पित्याला त्या ठरलेल्या ठिकाणीं वृक्षाच्या वळचणींत दडविलें, व त्याला काय काय बोलावें हे आगाऊच शिकवून ठेविलें. नंतर तो व त्याचा मित्र पंडित हे दोघे त्या वृक्षाजवळ जाऊन त्यांनी देवतेची प्रार्थना केली, व आपापलें म्हणणें कळवून निवाडा मागितला. अतिपंडिताच्या पित्यानें स्वर पालटून आपल्या मुलाच्या तर्फे न्याय दिला. तेव्हां बोधिसत्त्व आवेशयुक्त वाणीनें म्हणाला, "ही देवता मोठी लबाड दिसते. हिला या ठिकाणीं राहूं देणें इष्ट नाहीं."

असें बोलून त्यानें आसपास पडलेलीं लांकडें पाचोळा वगैरे गोळा करून त्या वृक्षाभोंवती पसरून त्याला आग लावून दिली. बिचारा अतिपंडिताचा बाप धुरानें गुदमरून गेला, व जळून

जाण्याच्या भीतीनें एका फांदीला लोंबकळून त्यानें खाली उडी टाकिली; आणि तो म्हणाला, "मुलगा पंडित झाला म्हणजे बस्स आहे; पण अतिपंडित नको ! माझा मुलगा अतिपंडित झाला म्हणून माझ्यावर आज फार भयंकर प्रसंग गुदरला ?"*

---------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

* मूळ गाथा --

साधु खो पंडितो नाम नत्थेव अतिपंडितो ।

अतिपंडितेन पुत्तेन मनम्हि उपकूळितो ॥

-----------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

ही लबाडी उघडकीस आल्यामुळें अतिपंडिताला नफ्याचा अर्धा हिस्सा देऊन बोधिसत्त्वाशीं तडजोड करणें भाग पडलें.

४२. लोभी ब्राह्मण.

(सिगाल जातक नं. ११३)

वाराणसींतील लोक उत्सवांत यक्षांना मत्स्यमांसादिकांचा बळी देत असत; व यक्षांना प्रसन्न करण्यासाठीं मातीच्या भांड्यांतून ठिकठिकाणीं दारू ठेवीत असत. अशा एका उत्सवाच्या प्रसंगीं वाराणसीबाहेरील स्मशानांत राहणारा एक कोल्हा मध्यरात्र झाल्यावर गटाराच्या मार्गानें आंत शिरला व बलिकर्मासाठीं ठिकठिकाणीं ठेविलेल्या मत्स्यमांसादिकांवर यथेच्छ ताव मारून त्यानें मातीच्या भांड्यांतील सुरेचें आकंठ पान केलें. त्यामुळें पुनः गटारद्वारें बाहेर पडण्याचें सामर्थ्य त्याच्या अंगीं राहिलें नाहीं. तो एका पुन्नाग वृक्षाच्या झाडींत जाऊन पडला, व सकाळ होईपर्यंत जागा झाला नाहीं. सकाळीं उठून शहरांतून निर्भयपणें बाहेर पडणें शक्य नव्हतें; म्हणून दडत दडत सडकेजवळ येऊन तो लपून बसला. इतक्यांत एक ब्राह्मण त्या मार्गानें नदीवर प्रातःस्नानासाठीं चालला होता. त्याला पाहून कोल्हा म्हणाला, "अहो, भटजीबुवा, तुमच्यापाशीं माझें कांहीं काम आहे. जरा एका बाजूला याल तर तें तुम्हाला सांगेन. तुमच्याच फायद्याचें आहे, तेव्हां वेळ फुकट

गेल्याबद्दल तुम्हाला वाईट वाटणार नाहीं." ब्राह्मण त्या जवळ गेल्यावर तो त्याला म्हणाला, "भटजीबुवा, तुमचीं वस्त्रें प्रावरणें पाहून तुम्ही दरिद्रीवस्थेनें गांजले आहांत असें वाटतें. तुमची ही स्थिति पाहून मला फार दया आली, व मजपाशीं असलेले दोनशें कार्षापण तुम्हाला दान करावे असा माझा निश्चय झाला आहे. पण दिवसा ढवळया मला तुमच्या बरोबर शहरांतील रस्त्यांतून जातां येणें शक्य नाहीं. तुम्ही जर आपल्या उपरण्यांत गुंडाळून मी सांगितलेल्या ठिकाणीं घेऊन जाल, तर आजच्या आज ते कार्षापण तुमच्या हवालीं करतों."

त्या लोभी ब्राह्मणाला मद्यपी शृगालाचें म्हणणें खरें वाटलें. व आपल्या उपरण्यांतून त्यानें त्याला गांवाबाहेर स्मशानांत नेलें. तेथें खाली ठेविल्याबरोबर उपरण्यांत देहधर्म करून शृगालानें जंगलांत पळ काढिला.

त्यावेळीं आमचा बोधिसत्त्व त्या ठिकाणीं देवता होऊन रहात असे. हें शृगालाचें कृत्य पाहून तो त्या ब्राह्मणाला म्हणाला, "हे ब्राह्मणा, मद्यपी शृगालावर विश्वास ठेवून तूं आपली फजिती करून घेतलीस. याजपाशीं शंभर कवड्याहि मिळावयाच्या नाहींत मग दोनशें ताम्र कार्षापण कोठून असणार ? * आतां तुझें उपरणें धुवून मुकाट्यानें चालता हो, व द्रव्यलोभामुळें पुनः असा फसूं नकोस."

---------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

* मूळ गाथा--

सद्धहसि सिगालस्स सुरापीतस्स ब्राह्मण ।

सिप्पिकानं सतं नत्थि कुतो कंससता दुवे ॥

---------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

४३. वाईट परिस्थितींत वाढलेला प्राणी.

(अकालराविजातक नं. ११९)

एका जन्मीं बोधिसत्त्व औदिच्य ब्राह्मण कुलांत जन्मला होता. वयांत आल्यावर शास्त्राध्ययन करून वाराणसींत उत्तम आचार्य या नात्यानें तो प्रसिद्धीस आला. त्याजवळ पांचशें शिष्य अध्ययन करीत असत. त्या शिष्यांपाशीं एक वेळेवर आरवणारा कोंबडा होता. त्याच्या आरवण्यानें ते जागे होऊन अध्ययनाला सुरुवात करीत असत. तो कोंबडा कांहीं काळानें मरण पावला. तेव्हां दुसऱ्या कोंबड्याच्या शोधांत त्यांनी बरेच दिवस घालविलें. एके दिवशीं त्यांतील एक तरूण विद्यार्थी श्मशानाच्या जवळ लांकडें गोळा करीत असतां त्याला तेथें राहणारा एक दिसण्यास सुंदर असा कोंबडा सांपडला. त्याला आणून त्या विद्यार्थांनी आपल्या जागेंत ठेविलें व त्याची उत्तम रीतीनें शुश्रूषा चालविली. पण हा कोंबडा भलत्याच वेळीं आरवून त्यांना त्रास देऊं लागला. एखाद्या वेळेस तो मध्यरात्रीच्या सुमारास मोठ्यानें ओरडत सुटे. तेव्हां पहाट झाली असें समजून विद्यार्थिगण जागा होऊन अध्ययनास लागे, व त्यामुळें सकाळीं गुरुजीजवळ पाठ म्हणण्यास सुरुवात केली असतां त्यांचे डोळे निजेनें भरून येत असत. एखादे वेळेस तो सकाळ झाली तरी ओरडत नसे व त्यामुळें विद्यार्थि तसेच बिछान्यावर पडून रहात असत. सकाळीं गुरूजवळ पाठ म्हणण्यास जावें तों यांची मुळींच तयारी झालेली नसे. हा प्रकार होऊं लागला तेव्हां त्यांनीं त्या कोंबड्याला ठार मारिलें, व आचार्याजवळ जाऊन ते म्हणाले, "गुरुजी, कांहीं दिवसांपूर्वी आणलेल्या कोंबड्यानें आम्हाला फार त्रास दिला. आपल्या आरवण्यानें भलत्याच वेळीं जागें करून तो आमच्या अध्ययनांत व्यत्यय आणीत असे."

आचार्यानें तो कोंबडा कोठें सांपडला वगैरे सर्व माहिती विचारून घेतली, व तो त्यांना म्हणाला, "हा कोंबडा आईबापांशिवाय वाढलेला, आचार्याचा सहवास त्यानें कधींहि केला नाहीं. तेव्हां काल किंवा अकाल तो जाणत नसला तर त्यांत नवल कोणतें ? योग्यायोग्य जाणण्यास प्राणी चांगल्या परिस्थितींतच जन्मला असला पाहिजे."

४४. कोणत्याही प्रकारच्या शिक्षणानें मूर्ख शहाणा होऊं शकत नाहीं.

(नंगलीस जातक नं. १२३)

दुसऱ्या एका जन्मीं बोधिसत्त्व ब्राह्मणकुलांत जन्मला होता. वयांत आल्यावर तक्षशिला नगरीस जाऊन त्यानें सर्व शास्त्राचें अध्ययन केलें व पुनः वाराणसीला येऊन तेथें आपल्या सद्‌गुणांनीं उत्तम आचार्यांत आपली गणना करून घेतली. त्याच्यापाशीं शिकण्यास्तव पुष्कळ शिष्य रहात असत. त्यांत एक शिष्य आपल्या गुरूच्या सेवेंत अत्यंत तत्पर असे; परंतु जडत्वामुळें शास्त्राध्ययनांत त्याचें पाऊल पुढें पडत नसे. एके दिवशी आचार्यानें जेवल्यानंतर त्याला आपली पाठ दाबण्यास सांगितली. तें काम आटपून तो जाण्यास निघाला असतां बोधिसत्त्व त्याला म्हणाला, "बाळा या खाटेचे पाय वरखालीं झाल्यामुळें ती डळमळते. तेव्हां एका पायाला कांहीं तरी टेका देऊन मग जा." शिष्याला दुसरा कांहीं टेका न सांपडल्यामुळें खाटेच्या पायाला मांडीचा टेका देऊन त्यानें सर्व रात्र तेथेंच काढिली. सकाळीं जेव्हां आचार्याला ही गोष्ट समजली तेव्हां त्याच्या मनाला ती फार लागली. "हा माझा विद्यार्थी माझ्यावर अत्यंत प्रेम करीत असून माझ्याकडून याचें कांहींच हित होत नाहीं. इतर विद्यार्थी पुढें पुढें जात असून याला अगदीं आरंभीचे पाठ देखील येत नाहींत. याला शिकवण्याला कांहीतरी मार्ग सांपडेल काय ?" अशा विचारांत बोधिसत्त्व निमग्न होऊन गेला. व त्यानें मोठ्या कष्टानें एक युक्ति शोधून काढली.

दुसऱ्या दिवशीं त्या विद्यार्थ्याला जवळ बोलावून बोधिसत्त्व म्हणाला, "बाबारे, तुला शिकविण्यासाठीं मी एक नवीन युक्ति शोधून काढिली आहे. आजपासून तूं तुझा धडा तयार नाहीं केला तरी हरकत नाहीं. परंतु जेथें जाशील व एखादी नवी वस्तू पाहशील तेथें तेथें त्या वस्तूसंबंधानें नीट विचार कर, व घरीं आल्यावर मी प्रश्न विचारिला असतां तिचें नीट वर्णन कर."

त्याच दिवशीं दुपारीं तो विद्यार्थी वनांत गेला असतां त्याला एक साप आढळला. घरीं आल्यावर त्यानें हें वर्तमान आपल्या गुरूस कळविलें. तेव्हां आचार्य म्हणाला, "तो साप कसा होता ? एखादी उपमा देऊन त्याचें वर्णन कर." शिष्य म्हणाला, "तो नांगराच्या इसाडासारखा होता." आचार्याला शिष्यानें केलेल्या उपमेनें फार आनंद झाला. साप नांगराच्या इसाडासारखा असावयाचा तेव्हां शिष्याची अवलोकनशक्ति हळुहळु वृध्दिंगत होत जाईल अशी गुरूला बळकट आशा वाटूं लागली.

कांहीं कालानें शिष्याला अरण्यांत फिरत असतां एक हत्ती आढळला. त्यानें ताबडतोब गुरूला ही गोष्ट सांगितली. तेव्हां गुरूनें हत्ती कसा असतो असा प्रश्न केला. शिष्यानें रोकडा जबाब दिला की, नांगराच्या इसाडासारखा. बोधिसत्त्वाला वाटलें कीं, हत्तीची सोंड नांगराच्या इसाडासारखी असते; परंतु मंदबुद्धिमुळें यानें सर्वच हत्ती नांगराच्या इसाडासारखा असतो अशी उपमा केली असावी. विचार करिता करितां हा सुधारल्यावांचून रहाणार नाहीं.

शिष्यानें आपल्या सहाध्यायांबरोबर दुसऱ्या दिवशीं एक ऊंस खाल्ला व घरी जाऊन ही गोष्ट आपल्या गुरूला सांगितली. बोधिसत्त्वानें ऊंस कसा असतो असा प्रश्न केल्यावर शिष्यानें नांगराच्या इसाडासारखा असतो, असा आपला ठरीव जबाब दिला. उंसाचें आणि नांगराच्या इसाडाचें थोडेसें साम्य आहे असें जाणून बोधिसत्त्व कांहीं न बोलतां उगाच राहिला.

एके दिवशीं त्या शिष्याला आणि त्याच्या कांहीं सहाध्यायांला एका घरीं आमंत्रण होतें. त्या गृहस्थानें त्याला दूध, दही वगैरे पदार्थ यथेच्छ खाऊं घातले. शिष्यानें ती गोष्ट घरीं येऊन आपल्या गुरूला निवेदन केली. दूध, दहीं कसें असतें असा प्रश्न विचारिल्यावर नांगराच्या इसाडासारखें, असा त्यानें कायमचा जबाब दिला, तेव्हां आमच्या बोधिसत्त्वाची त्याच्या शिक्षणाबद्दल पूर्ण निराशा झाली. तो म्हणाला, "आजपर्यंत मला याची बुद्धि वृध्दिंगत होईल अशी थोडीबहुत आशा वाटत होती पण या मूर्खाला दहीं, दूध आणि नांगराचें इसाड याची सांगड घालण्याला मुळींत दिक्कत वाटत नाहीं ! जणूं काय नांगराच्या इसाडाची उपमा यानें कायमचीच बनवून ठेवली आहे !"

४५. परोपकाराचें फळ.

(अंबजातक नं. १२४)

एकदां आमचा बोधिसत्त्व ब्राह्मणकुलांत जन्मला होता. वयांत आल्यावर ऋषिवेषानें तो हिमालयावर रहात असे. तेथें त्याचे पुष्कळ शिष्य होते. एका वर्षी हिमालयावर भयंकर उन्हाळा

सुरू झाला व त्यामुळें पाण्याचे झरे वगैरे आटून गेले. मृगादिक प्राण्यांना पाणी मिळण्याची फार अडचण पडूं लागली. तेव्हां बोधिसत्त्वाच्या शिष्यांपैकीं एका तपस्व्यानें एक लांकडाची मोठी दोणी करून तेथील पशूंला पाणी पाजण्यास सुरुवात केली. पण त्यामुळें त्याला फलमुलें आणण्यासाठीं अवकाश मिळेनासा झाला, व उपाशीं पोटींच पशूंना पाणी पाजण्याची पाळी आली. तथापि त्यानें आपला प्रयत्न न सोडतां सर्व श्वापदांची तृप्ति करण्याचा क्रम तसाच पुढें चालविला. तें पाहून पशूंनीं "हा तपस्वी आमच्यासाठीं फार कष्ट सहन करितो. तेव्हां याचे उपकार फेडणें अत्यंत आवश्यक आहे." असा विचार करून सर्वानुमतें हा ठराव पास केला, "आजपासून जो प्राणी येथें पाणी पिण्यास येईल त्यानें रिकामें न येता आपल्या सामर्थ्याप्रमाणें एकतरी मनुष्योपभोगाला योग्य असें फळ घेऊन यावें. रिक्त हस्तें येऊं नये."

दुसऱ्या दिवसापासून बोधिसत्त्वाच्या आश्रमांत फळांचे नुसते ढीग पडूं लागले. पांचशें तपस्व्यांला दुसऱ्या ठिकाणीं फलमूलांचा शोध करण्यास गेल्यावांचून तेथल्या तेथें आहार मिळूं लागला. व त्यामुळें त्यांच्या तपश्चर्येला मोठी मदत झाली. त्या तपस्व्याच्या कृत्यानें बोधिसत्त्व खूष होऊन आपल्या शिष्यगणाला म्हणाला, "तपस्वी हो, परोपकाराचें हें फल लक्षांत ठेवण्यासारखें आहे. आमच्यापैकीं एकानें परोपकरार्थ आपला देह झिजविल्यामुळें आमच्या तपश्चर्येला पुष्कळ मदत झाली आहे. म्हणून परोपकार करण्यास आपण सदोदित झटलें पाहिजे."

## ४६. परदेशीं जाऊन डौल मारणें सोपें असतें.

(कटाहकजातक नं. १२५)

आमचा बोधिसत्त्व एका जन्मीं वाराणसी नगरींत अत्यंत धनाढ्य श्रेष्ठी झाला होता. वयांत आल्यावर त्याला एक सुस्वरूप मुलगा झाला. त्याच दिवशीं त्याच्या दासीलाहि एक मुलगा झाला. या दासीपुत्राचें नांव कटाहक असें ठेवण्यांत आलें. तो आपल्या धन्याच्या मुलाबरोबरच वाढला. लहान मूल असल्यामुळें त्याला कोणी आडकाठी करीत नसत. पुढें बोधिसत्त्वाच्या मुलाला अक्षर ओळख करून देण्यासाठीं एक शिक्षक ठेविला. तेव्हां कटाहक देखील त्या शिक्षकाजवळ जाऊन आपल्या मित्राबरोबर लिहिण्यावाचण्यास शिकला. त्याची हुषारी पाहून पुढें वयांत आल्यावर बोधिसत्त्वानें त्याला आपल्या तिजोरीचा अधिकारी नेमिलें. तें काम तो मोठ्या दक्षतेनें करीत असे. तथापि त्याला अशी शंका आली कीं, "कितीहि झालें तरी मी पडलों दासीपुत्र, माझा लहानसहान दोष देखील सर्वांना मोठा वाटेल; व कदाचित् माझा छळहि करितील आणि पुनः माझ्याकडून दासकर्म करवून घेतील. तेव्हां येथें रहाणें सुरक्षित वाटत नाहीं."

दिवसें दिवस दुसऱ्या कोठेंतरी दूरच्या गांवी पळून जावें हा कटाहकाचा विचार दृढ होत गेला. पण परक्या गांवीं निर्वाह कसा करावा याची त्यास पंचाईत पडली. शेवटीं त्यानें एक युक्ति शोधून काढली. ती अशी- " दूरच्या एका लहानशा शहरांत श्रेष्ठीच्या ओळखीचा व्यापारी रहात असे. त्याचा आणि बोधिसत्त्वाचा व्यापारासंबंधानें वारंवार पत्रव्यवहार होत असे. बोधिसत्त्वाच्या तर्फे बहुधा कटाहकच हीं पत्रें लिहीत असे, व त्यांवर बोधिसत्त्वाचा शिक्का मारून तीं रवाना करीत असे. अशाच एका प्रसंगीं त्यानें आपल्या संबंधानें त्या व्यापाऱ्याला पत्र लिहून त्यावर श्रेष्ठीचा शिक्का मारून तें बंद करून आपल्या पदरीं ठेविलें व दोन चार दिवसांनीं वाराणसींतून पळ काढला. त्याच्याजवळ जें द्रव्य होतें तें खर्चून वाटेंत त्यानें आपला निर्वाह चालविला आणि बरेंच दिवस प्रवास करून व्यापारी रहात होता तें शहर गांठलें. व्यापाऱ्यानें 'कोठून आलांत' असा प्रश्न केल्यावर तो म्हणाला, "वाराणसी नगरींतील प्रसिद्ध श्रेष्ठीचा मी पुत्र आहें. माझ्या थोरल्या भावामध्यें आणि मजमध्यें तंटा होऊं नये म्हणून माझ्या पित्यानें मला आपणापाशीं पाठविलें आहे. आपणाला मुलगा नाहीं असें आम्हीं ऐकतों. तेव्हां आपण माझें पुत्रवत् पालन करून आपल्या कन्येशीं माझा विवाह करून द्याल अशी माझ्या पित्याला दृढ आशा वाटत आहे, व याचसाठीं मला त्यानें हें पत्र दिलें आहे." असें म्हणून कटाहकानें तें पत्र त्या व्यापाऱ्यासमोर टाकिलें. त्यांत हाच मजकूर होता. श्रेष्ठीनें आपला मुलगा बुद्धिमान असून व्यापारांत दक्ष आहे, तेव्हां त्याला आपणाजवळ ठेऊन घेऊन आपला घरजांवई कराल अशी आशा बाळगतों इत्यादि मजकूर लिहिला होता. तो वाचून त्या व्यापाऱ्याला फारच आनंद झाला. एवढ्या मोठ्या सावकाराचा मुलगा आपल्यासारख्या गरीब व्यापाऱ्याचा

घरजांवई होणें मोठें भूषणास्पद आहे. तेव्हां ही आपल्या घरीं लक्ष्मी चालत आली आहे असें त्यास वाटलें; व पहिल्या मुहूर्तावर त्यानें कटाहकाशीं आपल्या कन्येचें लग्न लावून दिलें.

कटाहक जात्या हुषार होता हें वर सांगितलेंच आहे. पण आगंतुक श्रीमंतीमुळें त्याच्या अंगी एक दुर्गुण शिरला होता. तो ज्याच्या त्याच्या अंगावर तोंड टाकीत असे. लहानसहान अपराधहि त्याला सहन होत नसे. भोजनसमयीं स्वयंपाकांत कांहीं कमतरता दिसून आली तर तो आपल्या बायकोवर फार संतापत असे, व त्यामुळें त्या बिचारीला उगाच त्रास सोसावा लागत असे. याशिवाय कटाहकाच्या वर्तनांत म्हणण्यासारखे दुसरे दोष नव्हते.

कटाहक पळून गेल्यावर श्रेष्ठीला वर्ष दोन वर्षे त्याचा पत्ता लागला नाहीं. पण पुढें तो व्यापाऱ्याच्या घरीं घरजांवई होऊन रहात आहे ही बातमी त्याला समजली, व तिचा खरेपणा पाहण्यासाठीं त्यानें आपले हेर त्या शहरीं पाठविले. त्यांनी जेव्हां बोधिसत्त्वाला कटाहकाचें इत्थंभूत वर्तमान सांगितलें, तेव्हां त्यानें तेथें जाऊन त्याची फजीति करून पुनः आपल्या घरीं आणण्याचा निश्चय केला व त्याप्रमाणें आपल्याबरोबर मोठा सरंजाम घेऊन तो त्या शहरीं जाण्यास निघाला. तो त्या शहरापासून कांहीं अंतरावर पोहोंचला नाहीं तों त्याच्या आगमनाचें वर्तमान कटाहकाला समजलें, व तो अगदीं घाबरून गेला. श्रेष्ठी या ठिकाणीं आला तर आपली पुरी फजीति होणार हें तो जाणून होता पण येथून दुसऱ्या ठिकाणीं पळून जाणें हें देखील त्याला इष्ट वाटेना. कांहीं काळ कटाहक किंकर्तव्यमूढ होऊन विवंचनेंत पडला. परंतु त्याच्या समयसूचकबुद्धीनें त्याला शेवटीं हात दिला. या नवीन संकटांतून पार पडण्यास त्यानें नवीच युक्ति शोधून काढली. त्या दिवसापासून आपल्या आप्तइष्टांजवळ तो पितृभक्तीचीं मोठमोठालीं वर्णनें करूं लागला. तो म्हणाला, "अहो तुमचें हें शहर म्हणजे वाराणसीच्या मानानें नुसतें खेडेगांव आहे. येथील लोकांना रीतरिवाज कांहींच माहीत नाहीं. पितृभक्ति कशी असते हें या गांवढळ लोकांना कसें समजणार. तुम्ही एकदां वाराणसीला जाऊन पहा ! आम्हीं तेथें आमच्या वडिलांसमोर कधींहि खालीं बसत नसतों. भोजनसमयीं त्यांची सर्व सेवा करतों. पिकदाणी लागली तर आणून देतों. एवढेंच नव्हे तर वडील शौचाला जावयास निघाले; तर स्वतः त्यांजबरोबर त्यांच्या उपयोगासाठीं पाणी नेऊन ठेवितों. असलीं कामें आम्ही आमच्या नोकरांवर मुळींच सोंपवित नसतों पण या गांवीं तुम्हाला अशा तऱ्हेनें पितृसेवा करावी ही गोष्ट माहीत तरी आहे काय ?"

त्या शहरांतील लोकांनीं वाराणसींत फार दिवस वास्तव्य केलें नसल्यामुळें व तेथील रीतिरिवाजाची माहिती नसल्यामुळें कटाहक सांगेल तें त्यांना प्रमाण होऊन बसलें, व काशीच्या चालीरीतीसंबंधानें त्यांना एकप्रकारचा मोठा आदर वाटला.

महाश्रेष्ठी लवकरच त्या शहरीं पोहोंचणार हें जाणून कटाहक आपल्या सासऱ्याला म्हणाला, "मामाजी, तुम्ही माझ्या पित्याच्या आदरातिथ्याची सर्व तयारी करून ठेवा. मी पित्याच्या भेटीला आमच्या सामर्थ्यांप्रमाणें नजराणे घेऊन जातों व मोठ्या गौरवानें त्याला तेथें घेऊन येतों. आपले वडील इतके जवळ आले आहेत हें जाणून घरींच बसून राहणें हें वाराणसींतील कुलपुत्रांना अत्यंत अनुचित आहे. तेव्हा मी आजच्या आज माझ्या पित्याच्या भेटीसाठीं जात आहे."

बराच लवाजमा बरोबर घेऊन तो महाश्रेष्ठीच्या दर्शनाला गेला. वाटेंत महाश्रेष्ठी एका ठिकाणीं उतरला होता. तेथें कटाहकानें त्याची भेट घेऊन आपण आणलेले नजराणे दिले. श्रेष्ठीला मोठा चमत्कार वाटला ! आपलें नांव ऐकल्याबरोबर कटाहकानें पलायन करावें किंवा गर्भगळीत होऊन जावें, असें असतां हा दासीपुत्र मोठ्या शौर्यानें आपल्याजवळ येऊन नजराणे देतो याचा अर्थ काय ? हें त्याला समजेना. श्रेष्ठी या विचारांत गढून गेला असतां स्नानाची वेळ झाली, स्नानाच्यापूर्वी शौचविधीला जाण्याचा श्रेष्ठीचा परिपाठ असे. त्याप्रमाणें श्रेष्ठी आपल्या ठाण्याजवळच्या जंगलांत जाण्यास निघाला. त्यावेळीं कटाहकानें आपल्या लोकांना तेथेंच रहाण्यास सांगितलें, व तो उदकपात्र घेऊन, श्रेष्ठीच्या मागोमाग गेला. वाराणसींतील कुलपुत्र आपल्या पित्याची अनन्यभावें सेवा करीत असतात ही गोष्ट कटाहकाच्या सर्व नोकरांना माहीत असल्यामुळें त्यांना त्याच्या या कृत्यानें मुळींच आश्चर्य वाटलें नाहीं. श्रेष्ठी एकांत स्थानीं गेल्यावर कटाहकानें उदकपात्र खालीं ठेऊन त्याच्या पायावर एकदम उडी टाकली; आणि म्हणाला, "महाराज मी जरी आपला दासीपुत्र आहें, तथापि आपल्या मुलासंगेंच माझें आपण पालन केलें आहे. मी केलेले सर्व अपराध क्षमा करून येथें मला मुलाच्या नात्यानें वागविल्यास माझ्यावर अत्यंत उपकार होईल. पण जर तुम्ही माझें कृत्य उघडकीस आणाल तर त्यापासून कोणाचाच फायदा न होतां बिचाऱ्या माझ्या सासऱ्याच्या कुटुंबांत फारच गोंधळ उडून जाईल व त्यामुळें सर्वांना दुःख भोगावें लागेल."

बोधिसत्त्व फार दयाळू होता. त्याचें मन वळविण्यास कटाहकाला मुळीच आयास पडले नाहींत. शेवटीं त्याजकडून आपलें दासीपुत्रत्व उघडकीला न आणण्याबद्दल अभिवचन घेऊन कटाहक तेथून माघारा आला. त्या दिवसापासून तो श्रेष्ठीची दासाप्रमाणें सेवा करीत असे. श्रेष्ठी

व्यापाऱ्याच्या घरीं आल्यावर देखील कटाहकानें त्याची सर्वप्रकारें सेवा केली व त्याला प्रसन्न करून घेतलें.

एके दिवशीं कटाहक कांहीं कामानिमित्त बाहेर गेला असतां त्याची बायको बोधिसत्त्वाला भेटली. तेव्हां बोधिसत्त्व तिला म्हणाला, "काय सूनबाई, माझा मुलगा तुम्हाला चांगल्या रीतीनें वागवतोना ?" ती म्हणाली, "मामंजी, आपल्या चिरंजीवाचा कोणताही दोष नाहीं, त्यांचें माझ्यावर फार प्रेम आहे. केवळ भोजनप्रसंगीं कधीं कधीं कांहीं पदार्थ वाईट लागला तर ते माझ्यावर संतापत असतात; हाच काय तो त्यांचा दोष आहे." "मुली, माझा मुलगा लहानपणापासून असाच आहे. जेवण्याखाण्यांत त्याच्या फार खोडी असतात पण तूं वाईट वाटूं देऊं नकोस. त्याचें तोंड बंद करण्याचा एक मंत्र मी तुला शिकवून ठेवितों. तो तूं चांगला पाठ करून ठेव व जेव्हां माझा मुलगा तुझ्यावर रागावेल तेव्हां तो म्हणत जा. एक दोनदां या मंत्राचा प्रयोग केला असतां माझ्या मुलाची प्रकृति पाण्यापेक्षांहि थंड होईल हें मी तुला खात्रीनें सांगतों."

श्रेष्ठी कांहीं दिवस त्या व्यापाऱ्याच्या घरीं राहून वाराणसीला जाण्यास निघाला. कटाहक त्याच्याबरोबर बराच दूर अंतरावर गेला. व पुष्कळ नजराणे देऊन त्यानें त्याचा मोठा गौरव केला; आणि मोठ्या आदरानें साष्टांग नमस्कार करून पुनः आपल्या सासऱ्याच्या घरीं आला. या दिवसापासून त्याचा मान अधिकच वाढला. कां कीं, आतां त्याचें दासीपुत्रत्व उघडकीला येण्याचा संभव राहिला नाहीं. त्यामुळें बिचाऱ्या बायकोला भोजन प्रसंगीं अधिक त्रास होऊं लागला. एके दिवशीं आपल्या नवऱ्यासाठी स्वहस्तानें चांगलें जेवण तयार करून तिनें वाढण्यास सुरुवात केली. पहिलाच पदार्थ कटाहकाला आवडला नाहीं. तो फार संतापला. त्याच्या बायकोला सासऱ्यानें दिलेल्या मंत्राची आठवण झाली व तिनें ताबडतोब त्याचा प्रयोग केला. ती म्हणाली ः-

बहुंपि सो विकत्थेय्य अञ्ञं जनपदं गतो।

अन्वागन्त्वान दूसेय्य भुंज भोगे कटाहक ॥

अर्थ- दुसऱ्या देशांत जाऊन पुष्कळ बडबड करतां येते. पण परत येऊन तो हें उघडकीस आणील. तेव्हां हे कटाहक मुकाट्यानें मिळालेल्या पदार्थांचा उपभोग घे !

हा मंत्र कानीं पडल्याबरोबर कटाहक घाबरून गेला. श्रेष्ठीनें आपल्या हीनत्वाबद्दल सर्व कांहीं हिला सांगून ठेविलें असलें पाहिजे असें त्याला वाटलें. तेव्हांपासून बायकोवर संतापण्याची त्याची छाती झाली नाहीं. इतकेंच नव्हें तर तो नम्र आणि सालस बनला, व किती वाईट पदार्थ असला तरी त्यामुळें तो कधींहि चिडला नाहीं. जे काहीं मिळेल तेवढ्यानें संतुष्ट राहून आपला वेळ त्यानें सत्कर्मी खर्च केला.

४७. एकाला अपाय तो दुसऱ्याला उपाय.

(असिलक्खणजातक नं. १२६)

प्राचीन काळीं वाराणसी नगरींत ब्रह्मदत्त नांवाचा राजा राज्य करीत असतां त्याच्या पदरीं तरवारीची परीक्षा करणारा एक ब्राह्मण रहात असे. याला असिलक्षण पाठक ब्राह्मण असें म्हणत असत. तो एखाद्या लोहारानें राजाच्या उपयोगासाठीं नवीन तलवार आणली असतां तिचा वास घेऊन परीक्षा करीत असे. या त्या कौशल्यामुळें राजानें त्याला तलवारीचा परीक्षक नेमिलें होतें. पण हा अधिकार हातीं आल्यावर तो लोहाराकडून लांच घेऊन वाईट तलवारी चांगल्या ठरवूं लागला, आणि लाच न मिळाला तर चांगल्या तलवारीहि वाईट ठरवू लागला. ज्याला ही गोष्ट माहीत नव्हती अशा एका दूरच्या लोहारानें राजासाठीं उत्तम तलवार करून आणली. पण असिलक्षणपाठकाला लांच न मिळाल्यामुळें ती खोटी ठरली. त्या लोहारानें हा ब्राह्मण लबाड आहे हें तेव्हांच जाणलें, व याची खोड मोडण्यासाठीं त्यानें दुसरी एक अत्यंत तीक्ष्ण धारेची तलवार बनवून ती मिरचीच्या पुडींत चांगली लोळवून म्यानांत घालून दरबारांत आणली. राजानें असिलक्षणपाठकाला तिची परीक्षा करण्याचा हुकूम केला. त्यानें एकदम म्यानांतून काढून तिला आपल्या नाकाजवळ नेलें. मिरचीच्या पुडीच्या वासामुळें त्याला जोरानें शिंका आल्या, त्यायोगें हात घसरून त्याचें नाक कापलें गेलें ! राजानें आपल्या वैद्यांना बोलावून आणून ओषधोपचार करविले. व असिलक्षणपाठकाला गूण पडून जखम साफ बरी झाल्यावर एक लाखेचें कृत्रीम नाक करवून त्याच्या नाकावर बेमालूम बसवून देण्यास लाविलें. असिलक्षणपाठक राजाच्या मर्जीतील असल्यामुळें त्याचा गुन्हा उघडकीस आला होता, तथापि त्याला दरबारांतून घालवून देण्यांत आलें नाहीं. तो आपल्या कृत्रीम नासिकेसह राज्यसेवेला तत्पर राहिला.

या राजाला एकुलती एकच कन्या होती. तिचें लहानपणापासून आपल्या आतेभावावर म्हणजे राजाच्या भाच्यावर अत्यंत प्रेम जडलें. राजाला ही गोष्ट इष्टच वाटत होती. आपली कन्या भाच्याला देऊन त्यालाच आपल्या मागें गादीचा वारस करावें असा त्याचा बेत होता. परंतु त्याच्या मंत्र्यांचें असें म्हणणें होतें कीं, राजकन्येला एक बलाढ्य राजा वर मिळाला असतां आपल्या राजाचें हित होईल. त्यामुळें आपल्या आणि त्या राजाच्या राष्ट्रांत निकट हितसंबंध जुळून येऊन परस्परांची परस्परांला मदत होईल. राजाला हा सल्ला विशेष आवडला; व आपला पहिला बेत त्यानें रहित केला. परंतु त्याचा भाचा आणि मुलगी या दोघांमध्यें वृध्दिंगत होत असलेलें प्रेम खच्ची करणें फार कठीण होतें. तथापि निराश न होतां त्यानें त्या दोघांला एकत्र रहाण्याची सक्त मनाई केली. मुलीला राजवाड्यांत ठेऊन भाच्याला दूर दुसरें एक घर बांधून देण्यांत आलें.

नदीच्या प्रवाहाला बांध घातला असतां पाणी तुंबून जाऊन तें कोठून तरी बाहेर पडण्याची मार्गप्रतीक्षा करीत असतें. तद्वत् प्रेमाचीहि स्थिती आहे. त्याला कोणी आडकाठी केली असतां त्याचा जोर वाढत जाऊन तो भल्या किंवा बुऱ्या मार्गानें बाहेर पडल्यावांचून रहात नाहीं. राजकन्या आणखी तिचा भावी पति यांची प्रत्यक्ष गांठ पडत नव्हतीं. तथापि, अप्रत्यक्ष दासींच्या द्वारें दोघांचीहि भेट कशी जुळवून आणतां येईल या संबंधानें त्यांची खलबतें चालूं होतीं पण त्यांना भेटीचा योग जुळवून आणण्यास युक्ति सांपडली नाहीं.

राजदरबारीं एक चाणाक्ष ज्योतिषीणबाई होती. तिच्या कल्पकतेबद्दल सर्वांची खात्री होती. राजाच्या भाच्यानें नजराणे पाठवून व गोड गोड बोलून तिची मर्जी संपादन केली, व आपली आणि राजकन्येची भेट होण्याचा योग जुळवून आणण्याचा कांहीं उपाय शोधून काढण्याविषयीं तिला विनंती केली. त्या धूर्त बाईला यांत कांहीं विशेष अक्कल खर्चण्याचें कारण पडलें नाहीं. तिनें या कामीं जी युक्ति योजिली तिचा यापुढील गोष्टीवरून उलगडा होणारच असल्यामुळें येथें निराळा उल्लेख करीत नाहीं. एवढें सांगितलें म्हणजे पुरे आहे कीं, राजाच्या भाच्याला तिच्या मसलतीनें फार आनंद झाला, व तिनें सांगितलेल्या मार्गांचा अवलंब करण्याचें त्यानें तिला वचन दिलें.

ज्योतिषीणबाईनें आपण अशी युक्ति योजिली आहे हें राजकन्येला आगाऊच सांगून ठेविलें व तदनंतर राजाजवळ जाऊन ती म्हणाली "महाराज, आपल्या कन्येवर एका पिशाच्याची वक्रदृष्टी आहे. ताबडतोब शांति भूतशांति केली नाहीं तर तिच्यावर अनिष्ट संकटें येण्याचा संभव आहे." राजा

म्हणाला, "माझ्या एकुलत्या एका मुलीसाठीं मी भूतशांति करण्यास तयार होणार नाहीं, अशी तुमची समजूत आहे काय ? जें काय ठरावयाचें असेल तें मला आतांच सांगा. मी सर्व व्यवस्था आजच्याआज करविण्याचा हुकूम देतों."

ज्योतिषीणबाई म्हणाली, "महाराज, राजकन्येला स्मशानांत नेऊन टाका, मंचकावर निजवून त्या मंचकाखालीं एक प्रेत ठेविलें पाहिजे व भूतशांतीचे मंत्र उच्चारून तें भूत त्या प्रेतावर जाईल असा प्रयोग केला पाहिजे."

राजानें ज्योतिषीणबाईच्या म्हणण्याप्रमाणें सर्व व्यवस्था करावी अशी राजवाड्यांतील नोकरांना आज्ञा केली. प्रेत कशा रीतीचें निवडावें हें ज्योतिषीणबाईनें आपल्या हातीं ठेविलें होतें. ठरलेल्या दिवशीं राजाचा भाचा स्मशानाच्या कोपऱ्यांत जेथें हा विधी व्हावयाचा होता तेथें डोक्यावरून पायापर्यंत सर्व शरीर वस्त्रानें गुंडाळून निजला. त्यानें आपले सशस्त्र शिपाई आजुबाजूला झाडींत दडवून ठेविले होते, व आपणाबरोबर मिर्चीच्या पुडीची एक लहानशी डबी ठेविली होती. ज्योतिषीणबाईनें राजकन्येचा मंचक आणून या जिवंत प्रेतावरच ठेवविला; व ती राजवाड्यांतील नोकरांना म्हणाली "संभाळाहो माझा प्रयोगविधी चालला असतां या प्रेतांत राजकन्येवर असलेलें भूत शिरून तें नाचूं लागेल. व पहिल्यानें जो त्याच्या तावडींत सांपडेल त्याचा प्राण घेईल. या प्रेतांत जिवंतपणा आल्याचें चिन्ह म्हटलें म्हणजे त्याला एक दोन शिंका येतील, व त्या आल्याबरोबर तें उठून धावावयास लागेल. नंतर त्याच बाईनें राजकुमारीला गंधोदकानें स्नान वगैरे घालून यथाविधी त्या मंचकावर निजविलें, व मंत्र म्हणण्यास आरंभ केला. इतक्यांत खालील माणसानें मिरचीची तपकीर ओढली त्याबरोबर त्याला सटासट शिंका येऊं लागल्या. आतां हें प्रेत आमच्यांतील कोणाचा तरी बळी घेणार असें जाणून जो तो पळत सुटला ! ज्योतिषीणबाईनें तर सर्वांच्या आधींच पळ काढला ! राजाचा भाचा मंचकाच्या बाहेर येऊन राजकन्येला भेटला, व आपल्या सशस्त्र शिपायांसहवर्तमान त्यानें तिला स्वगृहीं नेलें. पुढें राजाच्या कानीं ही बातमी गेली तेव्हां तो आपल्या अमात्यांना म्हणाला, एवीं तेवीं माझा त्यालाच मुलगी देण्याचा बेत होता. मध्यंतरी तो रहीत झाला खरा. पण शेवटीं भाच्यानें स्वतःच तडीला नेला, असें म्हणण्यास हरकत नाहीं ! आतां त्याच्या या कृत्याबद्दल त्याला दंड न करतां त्याचें यथासांग लग्न करण्याची सर्व तयारी करा."

राजाज्ञेप्रमाणें विवाहमंगलाची सर्व व्यवस्था करण्यांत आली व शुभ मुहूर्तावर राजकन्येचें आणि राजाच्या भाच्याचें लग्न झालें. तेव्हांपासून राजानें सर्व राज्यभार जामातावर टाकून धर्मचिंतनांत कालक्रमणा करण्यास सुरुवात केली. असिलक्षणपाठक या तरुण राजाच्या सेवेला पूर्वीप्रमाणें सर्वथैव तत्पर असे. एके दिवशीं राजा उद्यानांत मोकळया जागीं बसला असतां असिलक्षणपाठक ब्राह्मण त्याजवळ उभा होता. त्यांचें संभाषण चालूं असल्यामुळें त्याला तेथून दुसरीकडे जातां येईना. पण सूर्याच्या बाजूला त्याचें तोंड असल्यामुळें लाखेचें नाक वितळलें व खाली पडलें. त्यायोगें त्याला फारच लाज वाटली. तो तोंड खालीं घालून ओशाळा होऊन मुकाट्यानें राहिला. नवीन राजा हा प्रकार पाहून हंसत हंसत त्याला म्हणाला, "गुरुजी, विनाकारण लाजूं नका कारण शिंकेमुळें तुमची हानि झाली असली तथापि ती सर्वांनाच अपाय करते असे नाहीं. कां कीं, त्याच शिंकेनें मला राज्यप्राप्ति झाली आहे ! एकाचा अपाय तो दुसऱ्याचा उपाय !

४८. दांभिक कोल्हा.

(अग्निकजातक नं. १२९)

एका काळीं बोधिसत्त्व उंदराच्या कुलांत जन्मला होता. वयांत आल्यावर पुष्कळ उंदरांचा राजा होऊन तो अरण्यांत एका गुहेंत रहात असे. त्या अरण्यांत एके दिवशीं गवताला आग लागून ती जिकडे तिकडे पसरली. तींत एक कोल्हा सांपडला. पळावयास दुसरी वाट न सांपडल्यामुळें त्यानें एका झाडाच्या बुंध्याचा आश्रय केला. बुंध्याला डोकें टेंकून तो तेथें मृतप्राय पडून राहिला. जवळपास गवत नसल्यामुळें तो भाजून मेला नाहीं. परंतु त्या दावाग्नीच्या ज्वालांनीं त्याच्या अंगावरील सर्व केस जळून गेले. डोकें बुंध्याला टेकलें असल्यामुळें त्यावर मात्र शेंडीसारखे वर्तुलाकार केस राहिले. एके दिवशीं पाणी पिण्यास गेला असतां आपली पडछाया पाहून त्याला मोठा चमत्कार वाटला. धार्मिक ब्राह्मणासारखी डोक्यावर तेवढी शेंडी, आणि बाकी अंग गुळगुळीत. तो आपल्याशींच म्हणाला, "शहाणा मनुष्य विपत्तीचा देखील फायदा करून घेतो. आगींनें होरपळून गेल्यामुळें जरी माझें नुकसान झालें आहे, तथापि या शेंडीचा चांगला उपयोग करून घेतां येईल."

आमच्या बोधिसत्त्वाचें निवासस्थान त्याला माहीत होतें; परंतु त्याच्या गुहेंतील शतमुखी बिळांत त्याचा रिघाव होणें केवळ अशक्य होतें. पण ते लठ्ठ लठ्ठ उंदीर या कड्यावरून त्या कड्यावर उड्या मारीत असतांना पाहून त्याला वारंवार पाणी सुटत असे. या नवीन शेंडीचा फायदा घेऊन आपला कांहीं डाव साधेल तर पहावा या हेतूनें त्यानें बोधिसत्त्वाच्या बिळापासून कांहीं अंतरावर तपश्चर्येला सुरुवात केली. आकाशाकडे पहात दोनच पायांवर उभें रहावें. तोंड वासून सूर्याकडे टकमक बघत बसावें, इत्यादि तपश्चर्येचे प्रकार त्यानें आरंभिले. त्याला पाहून बोधिसत्त्वाला वाटलें कीं हा कोणीतरी मोठा धार्मिक प्राणी असावा. तो कोल्ह्याजवळ जाऊन त्याला म्हणाला, "बाबारे, हें तूं काय चालविलें आहेस ? कोल्हा म्हणाला, "आयुष्याचे दिवस प्राण्याच्या हिंसेंत आणि दुसऱ्या अनेक पापकृत्यांत गेल्यामुळें मला दृढतर पश्चात्ताप झाला आहे. आणि त्या कृत्यांच्या परिमार्जनासाठीं घोर तपश्चर्या करण्याचा माझा निश्चय झाला आहे. यापुढें कोणत्याही प्राण्याला न दुखवितां त्यांची सेवा करावी. सर्व प्रकारें त्याच्या उपयोगी पडावें हेंच माझें व्रत आहे. तुम्हाला जर माझा कांहीं उपयोग झाला तर मला धन्य समजेन !"

मूषकराज म्हणाला, "आम्हाला तुमच्यापासून कांहीं नको आहे. तुम्ही सत्पुरुष आहा तेव्हां तुमच्या सारख्याच्या सहवासानें आमच्यावर फार मोठे उपकार होणार आहेत. तुम्ही या प्रदेशांत राहिलांत म्हणजे आम्हाला तुमचें वारंवार दर्शन होऊन मोठें पुण्य संपादण्याचा मार्ग खुला होईल."

कोल्हा म्हणाला, "हें सर्व खरें आहे. तथापि माझ्या तपश्चर्येला बळकटी आणण्यासाठीं मी तुमची सेवा करूं इच्छित आहे. लहानपणीं मी गणित शिकलों होतो, त्याचा मला येथें चांगला उपयोग होईल, तुम्ही सर्व उंदीर चरावयाला जात असतांना मी तुमची संख्या मोजीत जाईन व त्याप्रमाणेंच बिळांत जात असतां गणना करून एखादा दुसरा उंदीर हरवला तर आपल्याला कळवीत जाईन.

बोधिसत्त्वाला ही गोष्ट फारच पसंत पडली. उंदराच्या कळपाची यायोगें अभिवृद्धि होईल असें त्यास वाटलें; व कोल्ह्याच्या विनंतीस त्यानें रुकार दिला. तेव्हां कोल्हा म्हणाला, "मी तुमच्या

कळपाची गणना करीत असतां तुम्हीं सध्यांच्याप्रमाणें झुंडीनें जातां कामा नये. क्रमशः एक एकानें सरळ माझ्या जवळून गेलें पाहिजे.

बोधिसत्त्वानें ही कोल्ह्याची अट संतोषानें कबूल केली.

दुसऱ्या दिवसापासून कोल्ह्याच्या गणनेला सुरुवात झाली. सगळे उंदीर त्याजवळून गेल्यावर शेवटल्या उंदरावर झडप घालून त्याला तो तेथेंच उडपून टाकीत असे व आपल्या पोटाखालीं झाकून ठेऊन इतर दूर गेले म्हणजे मग त्याचा फळहार करीत असे. बोधिसत्त्वाची आणि त्याच्या कळपांतील उंदीरांची अशी दृढ समजूत होती कीं, कोल्हा मोठा धार्मिक असून तो तपस्व्याप्रमाणें आपला निर्वाह पाण्यावर आणि फलमूलावर करीत आहे. आणि म्हणूनच आपल्या कळपांतील उंदीर कमी होत जातात याचें कारण काय हें समजण्यास त्यांना बराच विलंब लागला. परंतु हा प्रकार फार दिवस चालणें शक्य नव्हतें. दिवसेंदिवस कळप क्षीण होत चालला. हे उंदीर गेलें कोठें बरे ? हें बोधिसत्त्वाला समजेंना. कोल्ह्याला विचारावें तों तो म्हणे कीं, कळपांतील उंदरांची संख्या बरोबर आहे. सकाळीं संध्याकाळीं गणना करून आपणाला त्यांत कांहीं न्यून आढळून येत नाहीं. परंतु बोधिसत्त्वाला त्याच्या सचोटीची अधिकाधिक शंका येऊं लागली. एके दिवशीं रोजच्याप्रमाणें गणनेच्या वेळीं सर्वाच्या पुढें न जातां तो दडून बसला व सर्व पुढें गेल्यावर आपण हळूंच मागून निघाला. कोल्ह्यानें वहिवाटीप्रमाणें त्यावर झडप घातली. परंतु बोधिसत्त्व अत्यंत सावध असल्यामुळें त्याला झपाट्यासरशीं पकडतां आलें नाहीं. इतक्यांत बोधिसत्त्वानें कोल्ह्याच्या नरडीवर उडी टाकून कडकडून चावा घेतला तेव्हां तो दांभिक कोल्हा वेदनेनें विव्हल होऊन मोठ्यानें आरडं लागला. तें पाहून बोधिसत्त्व त्याला म्हणाला, "हे दुष्ट कोल्ह्या, धर्माच्या पांघरुणाखालीं तूं आमचे गळे कापीत होतास ! लोकांना विश्वास दाखवून त्यांचा घात करणें याला धर्म म्हणत नाहींत ! याला पाहिजे तर मार्जारव्रत असें म्हणावें ! ही तुझी शेंडी धर्मज्ञान संपादण्यासाठीं नसून पोटाची खळी भरण्यासाठीं आहे ! या तुझ्या शाठ्याचें आतां प्रायश्चित भोग !

कोल्हा तरफडत खालीं पडला असतां बोधिसत्त्वाच्या कळपातील उंदरानीं त्याला तेथेंच ठार केलें.

------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

## ४९. आळसाच्या रोगावर रामबाण उपाय !

(कोसियजातक नं. १४०)

एका जन्मी बोधिसत्त्व ब्राह्मण कुलांत जन्मला. वयांत आल्यावर चार वेद आणि सर्व शास्त्रें यांत पारंगत होऊन वाराणसी नगरींत पुष्कळ शिष्यांना तो पढवीत असे. त्याचा एक ग्रामवासी शिष्य अध्ययन पुरें झाल्यावर काशींतील एका मुलीशीं विवाह करून तेथेंच घरदार बांधून रहात असे. पण या तरुण ब्राह्मणाची बायको अत्यंत दुष्ट होती. तिच्या बाह्यरूपाविरुद्ध तिचे गुण होते. बिचारा तरुण तिच्या रूपाला भुलून ती जें म्हणेल तें करण्यास तत्पर असे. सकाळीं उठून पोटांत दुखण्याचें निमित्त करून ती बाई अंथरुणावर पडून राही, व नवऱ्यास म्हणे कीं, माझ्यानें काहीं करवत नाहीं. तुम्ही चांगलें जेवण करून घातल्याशिवाय माझी पोटदुखी बरी व्हावयाची नाहीं बिचाऱ्या नवऱ्यानें घरांतील सगळीं कामें करावीं. एवढेंच नव्हे तर, ती जें म्हणेल तें तिला द्यावें व कधींकधीं आपण अर्ध्याच पोटीं रहावें, असा क्रम चालविला. अर्थात् त्या बाईचा रोग उत्तरोत्तर वाढतच गेला. तिचे शरीर पुष्ट होत होतें ! परंतु पोटदुखीला कांहीं गुण पडेना ! गरीब बिचारा तरुण तिच्या रोगानें अतिशय कंटाळून गेला. एके दिवशीं बोधिसत्त्वाच्या दर्शनाला गेला असतां बोधिसत्त्व त्याला म्हणाला, "कायरे आजकाल तूं कोठें दिसत नाहींस. तुझा चेहरा देखील अगदीं फिक्कट दिसतो. तुझें सर्व कांहीं ठीक चाललें आहेना ?"

तो म्हणाला, "गुरुजी, मी निरोगी आहे पण माझ्या तरुण बायकोच्या रोगानें मला भंडावून सोडलें आहे ! दिवसें दिवस तिचा रोग वाढत जात आहे, व त्यामुळें माझ्या जिवाला चैन पडत नाहीं."

बोधिसत्त्व म्हणाला, "असा तिला रोग तरी कोणता आहे ? काय ताप येतो, किंवा अन्न रुचत नाहीं, कीं होतें तरी काय ?

तरुण ब्राह्मण म्हणाला, "तिला ताप तर मुळींच नाहीं, अन्न चांगलें खपतें. एवढेंच नव्हें तर रोज नवीन नवीन पक्कान्नें तिला फार आवडतात ! तिचा रोग म्हटला म्हणजे तिचें पोट दुखतें. मी घरांत असेपर्यंत कोणतेंहि काम तिच्यानें करवत नाहीं. मी बाहेर जातों तेव्हां ती इकडून तिकडे फिरत असते असें माझ्या ऐकण्यांत आलें आहे. कदाचित बिछान्यांत पडून कंटाळा आल्यामुळें ती तसें करीत असेल ! कांही असो तिच्या या पोटदुखीनें माझे हाल होत आहेत एवढें खरें."

बोधिसत्त्वानें बाईला कोणता रोग झाला असावा हें तेव्हांच ताडलें ! व तो त्याला म्हणाला, "मी एक या रोगावर उत्तम औषध तयार करून देतों, पण तुझी बायको तें खुषीनें घेईल असें वाटत नाहीं. तिच्यावर जबरदस्ती करावी लागेल. प्रसंग आला तर तिच्यावर चाबकाचे चार तडाखे ओढण्याची तुझी तयारी आहे काय ?" तो म्हणाला, "गुरुजी, आपण हें काय विचारितां ? आपली आज्ञा मला सर्वथैव वंद्य आहे. तिचा रोग बरा होत असला तर चार सोडून दहा फटके मारले तर त्यांत दोष कोणता ?"

बोधिसत्त्वानें गोमुत्रांतून चिराईत वगैरे कडू औषधें उकळून त्यांचा काढा बनविला, व कांहीं वेळपर्यंत तो तांब्यांच्या नव्या भांड्यांत ओतून ठेविला. दुसऱ्या दिवशीं त्या तरुण ब्राह्मणाला बोलावून आणून बोधिसत्त्व म्हणाला, "हा काढा घेऊन जा व तुझ्या बायकोला पाज. बरोबर एक चाबूक घेऊन जाण्यास विसरूं नकोस."

त्यानें तो काढा आपल्या बायकोला नेऊन दिला. तेव्हां ती त्यावर फार संतापली, व म्हणाली, "मला हें तुमचें भिकारडें औषध पाहिजे कशाला ? तुपालोण्यानें जर माझा रोग बरा होत आहे, व मला गुण पडत आहे तर मग विनाकारण काढयांत पैसे कां घालवा ?"

तो म्हणाला, "पण आजपर्यंत तुपालोण्यावर पुष्कळ पैसे खर्चण्यांत आले. परंतु त्यापासून तुझा रोग साफ बरा झाला नाहीं. आज चांगलें पक्कान्न खावें आणि दुसऱ्या दिवशीं पुनः पोटदुखीला

सुरवात व्हावी. आतां आमच्या गुरूनें तयार करून दिलेला काढा घेतल्यांवाचून तुझा रोग बरा होण्याचा संभवच नाहीं."

त्या खाष्ट बाईनें निरनिराळ्या मार्गानें नवऱ्याची समजूत घालण्याचा बराच प्रयत्न केला. पण त्यानें साफ सांगितलें कीं, "काढा घेतला नाहीं तर चाबकाचा प्रयोक करून तो घेणें भाग पडावें लागेल." निकरावर गोष्ट आली, तेव्हां निरूपायानें तिनें त्या काढ्याचा एक घुटका घेतला. पण त्यायोगें तिचें तोंड वाकडें तिकडें होऊन तिला घेरी आली. थोड्या वेळानें सावध झाल्यावर ती नवऱ्याला म्हणाली, "मला हा काढा घ्यावयास लावूं नका. आजच्या दिवसाची मुदत द्याल, तर माझा रोग आपोआप बरा होईल असें वाटतें."

तो म्हणाला, "हा काढा असाच ठेऊन देतों व तुझा रोग एक दोन दिवसांत साफ बरा झाला नाहीं तर त्याचा तुझ्यावर पुनः प्रयोग करण्यांत येईल."

बाईचा रोग तात्काळ बरा झाला ! आपल्या नवऱ्याच्या गुरूसमोर आपले डावपेंच चालावयाचे नाहींत असें जाणून पूर्वीचा सर्व खोडसाळपणा तिनें टाकून दिला; व आपल्या नवऱ्याची ती अनन्यभावें सेवा करूं लागली.

## ५०. दुर्जनाचे प्रत्युपकार.

(असंपदानजातक नं. १३१)

प्राचीन काळीं राजगृह नगरींत मगध नांवाचा राजा राज्य करीत होता. त्यावेळीं आमचा बोधिसत्त्व त्याच राजधानींत महाश्रेष्ठीच्या पदाला पावला होता. त्याला शंखश्रेष्ठी म्हणत असत. वाराणसी नगरींत त्याचा बालमित्र पिलियश्रेष्ठी नांवाचा एक सधन व्यापारी रहात असे. कांहीं कारणानें त्या पिलियश्रेष्ठीवर मोठी आपत्ति येऊन त्याची सर्व धन दौलत बुडाली. तेव्हां तो आपल्या बायकोला बरोबर घेऊन पायीं राजगृहाला आला व शंखश्रेष्ठीला भेटला. शंखश्रेष्ठीनें त्याचा बहुमान केला, आणि आपल्या गृहीं त्याची सर्व प्रकारें बरदास्त ठेविली. अशा स्थितींत वाराणसीहून येथवर चालत येण्याचें कारण काय असा शंखश्रेष्ठीनें प्रश्न केला तेव्हां पिलिय म्हणाला, "मी समुळ बुडालों आहे. माझी धनदौलत माझ्या धनकोंनीं घेतली. दुसरा कोणी मदतगान न राहिल्यामुळें मला तुमची आठवण आली. व माझ्या कुटुंबासह मी येथवर पायीं चालत आलों."

शंखश्रेष्ठी म्हणाला, "तुम्ही येथवर येण्याची मेहेरबानी केली हें फार चांगलें झालें. आमच्या बालमैत्रीची कसोटी पाहण्यास तुम्ही मला चांगली संधि दिली."

याप्रमाणें संभाषण झाल्यावर शंखश्रेष्ठीनें आपली तिजोरी उघडून आंतील द्रव्याचे बरोबर दोन भाग केले व एक भाग पिलियश्रेष्ठीला दिला, व त्याचप्रमाणें आपले दासीदास हत्ती घोडे वगैरे सर्व मालमत्तेचे दोन विभाग करून त्यांतील एक पिलियश्रेष्ठीला दिला, व मोठ्या गौरवानें त्याला वाराणसीला रवाना केलें.

कांहीं वर्षे लोटल्यावर शंखश्रेष्ठीवर अवदशेचा घाला आला. सर्व संपत्ति नाश पावली. राजगृहांत राहण्याला देखील त्याला लाज वाटूं लागली. तेव्हां अर्थातच पिलियश्रेष्ठीची त्याला आठवण झाली. आपल्या बायकोला बरोबर घेऊन पिलियश्रेष्ठीला भेटण्यासाठीं तो वाराणसीला गेला. रात्रीं शहराबाहेरील धर्मशाळेंत उतरून सकाळीं शहरांत प्रवेश करण्यापूर्वी तो आपल्या पत्नीला म्हणाला, "भद्रे, तूं माझ्याबरोबर न येतां येथेंच रहा. तुला रस्त्यांतून पायीं आणल्याबद्दल पिलियश्रेष्ठी माझ्यावर फार रागावणार. पुरुष अनवाणी चालले तरी त्यांना कोणी नांवे ठेवणार नाहीं. परंतु तुझ्यासारख्या कुलीन स्त्रीला भर रस्त्यांतून अनवाणी चालत नेलें असतां लोक नांवें ठेवतील."

तिला ही गोष्ट पसंत पडली. शंखश्रेष्ठी एकटाच आपल्या मित्राजवळ गेला. पिलियश्रेष्ठीच्या वाड्याच्या दरवाजावर खडा पहारा होता. तेव्हां शंखश्रेष्ठीला आंत जाण्याची मोकळीक नव्हती. त्यानें दरवाजावरून आपण आलों आहों असा निरोप पाठविला, व आपला मित्र आपणाला कडकडून आलिंगन देण्याला येईल अशी कल्पना करीत वाट पहात उभा राहिला. परंतु पिलियानें वर यावें असा जबाब पाठविला. वर जाऊन पाहतों तों पिलीय खुशाल लोडाला टेंकून बसलेला होता ! तो तेथूनच शंखश्रेष्ठीला म्हणाला, "काय ! कोठें आलांत ?" आपणाला बसावयास आसन देखील मांडलेलें नाहीं हें पाहून शंखश्रेष्ठीला अत्यंत विस्मय वाटला ! तथापि मोठ्या गंभीरपणें तो म्हणाला, "मित्रा, दैवाची गति विचित्र आहे. माझ्या अफाट संपत्तीचा इतक्या लौकर नाश होईल असें मला स्वप्नांतहि वाटलें नव्हतें. परंतु आज मी कवडीला महाग होऊन या ठिकाणीं चालत आलों आहे. माझ्या स्त्रीलाहि मी बरोबर आणलें आहे. पण तुम्हाला वाईट वाटेल म्हणून तिला धर्मशाळेंतच ठेऊन आलों आहें."

पिलिय म्हणाला, "पण तुम्हाला उतरण्याला जागा मिळाली कीं नाहीं ? जेवण वगैरे झालें आहे कीं नाहीं ? आमच्या येथें सध्यां फार अडचण आहे. तेव्हां मला तुमची सोय करतां यावयाची नाहीं आणि तुम्हाला हेंहि समजलें पाहिजे कीं येथें कोणी तुम्हाला आश्रय देईल असें मला वाटत नाहीं."

बिचारा शंखश्रेष्ठी इतका ओशाळला कीं, त्याच्या तोंडांतून शब्द फुटेना. ज्याच्यावर एवढा मोठा उपकार करून फार वर्षे लोटलीं नाहींत त्याच्याच तोंडून असे उद्गार निघावेत हें पाहून तो अगदींच गोंधळून गेला, तथापि, भुकेची पीडा फार कठीण आहे असें म्हणतात तें कांहीं खोटें नाहीं. त्याला भूक लागली होतीच पण तेवढ्यानें कदाचित् त्यानें याचना केली नसती परंतु त्याची साध्वी स्त्री उपाशी होती, व तिची आठवण झाल्याबरोबर त्याचें चित्त थाऱ्यावर येऊन तो पिलियाला म्हणाला, "आम्हाला आपल्या घरी आश्रय मिळत नसला तरी हरकत नाहीं. पण आम्ही दोघींजणें आज सारा दिवस उपाशी आहों तेव्हां आमची दुसरी कांहीं सोय लागेपर्यंत शिधासामग्रीची व्यवस्था होईल तर बरें."

पिलियाच्या घरीं त्याच दिवशीं हजारों गाड्या भरून भात आलें होतें. भातांतील फोल निराळें काढून तें पेवांत भरून ठेवण्याचें काम चाललें होतें. तो आपल्या एका नोकराला हांक मारून म्हणाला, "या माणसाला त्या फोलांतून एक पायली भरून द्या."

नोकरानें त्याच्या आज्ञेप्रमाणें एक पायली फोल शंखश्रेष्ठीच्या पदरांत टाकलें. शंखश्रेष्ठी तें घेऊन मुकाट्यानें धर्मशाळेकडे चालता झाला. त्याची बायको आपला पति मोठ्या थाटमाटानें परत येईल अशा मनोराज्यानें वाट पहात राहिली होती. पण शंखश्रेष्ठीला पायींच परत आलेला पाहून तिला फार विषाद झाला. तरी त्याच्या पाठीवर गाठोडें पाहून तिला थोडेसें बरें वाटलें. आज जेवणाचें साहित्य मिळण्याची पंचाईत राहिली नाहीं; बऱ्याच दिवसांनीं सुग्रास अन्न खाऊं असें वाटून तिला बरीच हुषारी आली. ती शंखश्रेष्ठीला म्हणाली, "आर्यपुत्र, तुम्हीं पायींच परत आलां तेव्हां तुमच्या मित्रानें तुमचा योग्य सन्मान केला नसावा; किंवा त्याची तुमची भेट तरी झाली नसावी. कांहीं असो आपणाला आज शिधासामग्री तरी यथास्थित मिळाली पाहिजे असें या तुमच्या गाठोड्यावरून सहज अनुमान करितां येतें."

शंखश्रेष्ठी म्हणाला, "भद्रे, हें गांठोडें फोलाचें आहे ! श्रेष्ठीनें माझें प्रत्युपकार चार शेर फोल देऊन फेडले आहेत ! त्याने पुनः आपल्या घरीं येऊं नये असें बजावून सांगितलें आहे. आतां आम्हाला या शहरांत मजुरीवर निर्वाह करावा लागेल असें वाटतें."

ती म्हणाली, "मजुरी करण्याला मला लाज किंवा भीति वाटत नाहीं. परंतु त्या कृतघ्न माणसाकडून तुम्ही एक पायली फोल घेऊन आला याची मला फार चीड येते. हें फोल नेऊन पुनः त्याच्या स्वाधीन करा." असें बोलून तिनें तें गाठोडें नवऱ्याच्या अंगावर टाकलें.

तेव्हां शंखश्रेष्ठी शांतपणें म्हणाला, "भद्रे अशी रागावूं नकोस. तुझ्या इतकीच मला त्या दुष्ट पिलियाची चीड आली; परंतु त्यानें दिलेल्या फोलाचा मी स्वीकार केला नसता तर माझें वर्तन सभ्यपणाचें ठरलें नसतें, व त्या योगें त्याच्याकडून जसा मैत्रीचा भेद झाला तसाच तो माझ्याकडूनहि झाला असता. म्हणून निरुपायास्तव हें फोलाचें गाठोडें मला येथवर आणावें लागलें."

नीच पिलियाच्या अत्यंत कृतघ्नपणानेंहि आपल्या नवऱ्याच्या शांतीचा भंग झाला नाहीं हें पाहून त्या साध्वी स्त्रीला रडूं आलें. तिचा शोक इतका अनावर झाला कीं, तिचा रुदनस्वर धर्मशाळेंवरून जाणाऱ्या लोकांना सहज ऐकुं येऊं लागला. शंखश्रेष्ठीनें पिलियाला दिलेल्या दासांपैकी एकजण त्या मार्गानें चालला असतां त्यानें धर्मशाळेंत कोणी स्त्री रडत आहे हें ऐकून काय प्रकार आहे हें पाहण्यासाठीं आंत प्रवेश केला आणि पहातो तों आपली पूर्वीची मालकीण रडत असून मालक तिचें समाधान करीत आहे ! हें पाहून तो म्हणाला, "धनीसाहेब हा काय प्रकार आहे ? हें मला समजत नाहीं. आपण या ठिकाणीं कसें आला व या उतारूंच्या धर्मशाळेंत कां उतरला ?"

शंखश्रेष्ठीच्या पत्नीनें त्याला इत्थंभूत वर्तमान सांगितलें तेव्हां त्या दासाला आपल्या जुन्या मालकाची फार दया आली, व नव्या मालकाचा त्वेष आला. त्यानें आपल्या ओळखीच्या कांहीं गृहस्थांकडे जाऊन आपल्या जुन्या मालकावर आलोल्या प्रसंगाचें यथाभूत वर्णन करून त्यासाठीं त्यानें थोडीबहुत मदत मिळविली व त्याच धर्मशाळेंत कांहीं दिवस त्याची व त्याच्या पत्नीची जेवणाखाण्याची कशी बशी व्यवस्था लावून दिली. पुढें घरीं जाऊन शंखश्रेष्ठीनें पिलियाला दिलेल्या सर्व दासांना त्यानें हें वर्तमान कळविलें व त्यांच्या साहाय्यानें एक मोठा कट उभारला. पिलियश्रेष्ठीचे फार उपयोगी नोकर म्हटले म्हणजे शंखश्रेष्ठीकडून मिळालेले हे दासच होते. त्यांच्या स्वामीभक्तीनेंच पिलियाची सर्व कर्मे यथासांग चाललीं होतीं हें त्या दासांना माहीत होतें. त्यांनीं त्या दिवसांपासून पिलियश्रेष्ठीचें काम करण्याचें सोडून दिलें, व इतरांनाहि काम करण्याची मनाई केली. पिलियानें हें वर्तमान ऐकून त्यांच्यावर काठीचा प्रयोग करण्यास सुरुवात केली. तेव्हां त्या सर्वांनीं एकदम वाराणसीच्या राजाकडे जाऊन आपली फिर्याद दाखल केली. या फिर्यादींत पिलियाचा कृतघ्नपणा राजाला पूर्णपणें दिसून आला. शंखश्रेष्ठीची व त्याच्या पत्नीची साक्ष घेण्यांत आली. त्याप्रमाणें इतर नोकरांचीहि या बाबतींत साक्ष झाली.

राजा सर्व प्रकार ऐकून घेऊन पिलियाला म्हणाला, "आजपर्यंत मी तुला मोठा प्रामाणिक माणूस समजत होतों; परंतु तुझा प्रामाणिकपणा वरपांगीं आहे असें या खटल्यामुळें दिसून येत आहे. आतां तुला विचारतों कीं, तुझ्यावर प्रसंग आला तेव्हां तूं या शंखश्रेष्ठीकडून त्याची अर्धी संपत्ती घेऊन आलास कीं, नाहींस ?"

पिलियानें ही गोष्ट कबूल केली. तेव्हां राजा म्हणाला, "मग त्याची प्रत्युपकृती एक पायली फोलानें होईल असें तुला वाटलें काय ? तूं आमच्याकडून मिळालेल्या मानाला सर्वथैव अपात्र आहेस. तेव्हां तुझी सर्व संपत्ति शंखश्रेष्ठीला देण्याचा हुकूम देतों."

त्यावर शंखश्रेष्ठी म्हणाला, "महाराज, यानें जरी मला अत्यंत वाईट रीतीनें वागविलें तथापि, त्याच्या संपत्तीचा मी अभिलाष धरीत नाहीं. केवळ मी दिलेली धनदौलत आणि दासी दास त्यानें परत करावें म्हणजे झालें."

राजानें ताबडतोब शंखश्रेष्ठीची मागणी अमलांत आणण्यास लाविली. ती सर्व दौलत घेऊन शंखश्रेष्ठी राजगृहाला गेला. पिलियश्रेष्ठीजवळ अद्यापि पुष्कळ धनदौलत शिल्लक होती. पण कीर्ति मात्र समूळ नष्ट झाली होती. आणि "मरण कां लोकींच दुष्कीर्ति जें" या कविवचनाप्रमाणें त्याला मरणापेक्षां जीवितच अधिक कंटाळवाणें वाटत होतें.

५१. भांडवलावर डल्ला.

(सवण्णजातक नं. १३६)

बोधिसत्त्व एकदां ब्राह्मण कुलांत जन्मला होता. वयांत आल्यावर एका कुलीन कन्येबरोबर त्याचें लग्न होऊन त्या संबंधापासून त्याला तीन मुली झाल्या; परंतु दुर्दैवाची गोष्ट ही कीं, त्या मुलींचीं लग्नकार्ये होईपर्यंत तो जगला नाहीं. मेल्यावर तो हिमालयातील एका हंसकुलांत जन्मला. त्याच्या पूर्वपुण्याईमुळें मधून मधून त्याला सोन्याची पिसें फुटत असत; आणि पूर्वजन्मीचें स्मरण करण्या इतकेंहि त्याच्या अंगी सामर्थ्य होतें. तो बराच मोठा झाल्यावर पूर्व जन्मीं आपण कोण होतों याचा विचार करीत बसला; आणि त्याच्या सामर्थ्यानें पूर्व जन्माची त्याला सर्व आठवण झाली. आपल्या पोरक्या मुलींना आणि अनाथ स्त्रीला टाकून कर्मगतीमुळें मरण आलें याचें त्याला क्षणभर दुःख झालें. पण तो आपल्या मनाशींच म्हणाला, "आतां शोक करीत बसण्यांत अर्थ नाहीं. सर्व प्राणी कर्माला वश असल्यामुळें कर्म जी गोष्ट घडवून आणतें तिचा त्यांनीं विषाद मानतां कामा नये.

माझ्या पूर्व जन्मीच्या कुटुंबाची जर विपन्नावस्था असेल, तर मला त्यांना या हंसयोनींत जन्मून देखील थोडीबहुत मदत करतां येण्यासारखी आहे, हें मी माझें मोठें भाग्य समजतों. माझीं पिसें जून झाल्यावर सोन्याचीं बनत असतात; असें एखादें पीस आठचार दिवसांनीं त्यांना दिलें असतां तीं आपला निर्वाह करून सुखानें राहतील."

असा विचार करून तो हंस तेथून उडाला आणि थेट आपल्या पूर्वजन्मींच्या घरीं गेला. त्याला आपल्या पूर्व कुटुंबाची दुर्दशा तेव्हांच दिसून आली. बाई दळण कांडण करून निर्वाह करीत होती. व त्या तिघी मुली मुलांना सांभाळण्याचीं वगैरे कामें करून कसा तरी निर्वाह करीत असत. घराची पूर्वीची सर्व शोभा नष्ट झाली होती ती सर्व स्थिती पाहून हंसाला फार कींव आली व तो त्या मुलींना म्हणाला, "मुलींनो, तुम्ही अत्यंत दुर्गत दिसतां; परंतु तुमची दुर्दशा संपत आली असें समजा. दोन चार दिवसांआड तुम्हांला एकेक सोन्याचें पीस देत जाईन. त्यांवर तुम्हा सर्वांचा निर्वाह होऊन शिवाय थोडा द्रव्यसंचय देखील करितां येईल."

मुली म्हणाल्या, "पण तूं पक्षी असून एवढा मोठा आम्हांवर उपकार करूं पाहतोस याचें आम्हांला मोठें आश्चर्य वाटतें ! आमच्या शेजाऱ्यापाजाऱ्यांना आणि सोयऱ्याधायऱ्यांना या आमच्या विपन्न स्थितीबद्दल कांहींच वाटत नाहीं; परंतु तुझ्यासारख्या पक्षाला आमची एवढी कींव कां यावी बरें ?" हंस म्हणाला, "मी पूर्व जन्मीं तुमचा बाप होतों. कर्मगतीनें या योनींत मी जन्मलों आहे. तथापि पूर्व पुण्याईमुळें माझीं पिसें सोन्याचीं होतात. मला मनुष्यासारखें बोलतां येतें व पूर्वजन्मीं मी कसा होतों याचें स्मरण करतां येतें."

हें हंसाचें वृत्त ऐकून त्या मुली चकित झाल्या व आईपाशीं धांवत जाऊन त्यांनीं तें तिला कळविले आपणाजवळ थोडेसे शिल्लक असलेले दाणे त्यांनीं त्या हंसाला चारले, व त्याला प्यावयास पाणी दिलें. त्यानें सोन्याचें एक पीस दिलें व तो तेथून उडून गेला. हा क्रम पुष्कळ दिवस चालला होता. एकदोन दिवसा आड हंसानें येऊन सोन्याचें पीस देऊन जावें, व त्यांनीं तें पीस विकून आपला निर्वाह करावा. या योगें त्या कुटुंबाला लवकरच ऊर्जितावस्था आली. मुलींच्या अंगावर दागदागिने दिसूं लागले; परंतु त्या विधवाबाईची एवढ्यानें तृप्ति झाली नाहीं. एकदिवशी ती आपल्या मुलींना म्हणाली. "मुलींनो, पशुपक्षादिकांच्या योनींत जन्मलेल्या प्राण्याचा विश्वास मानतां येत नाहीं. आज

जरी हा हंस आम्हांला सोन्याची पिसें देत असला, तरी याचें प्रेम असेंच कायम राहील असें कोणी सांगावे ! तेव्हां एके दिवशीं याला पकडून याचीं सर्व पिसें आपण काढून घेऊं."

मुलींना आईची ही मसलत पसंत पडली नाहीं. त्या म्हणाल्या, "हा हंस जरी पक्षाच्या वंशांतला आहे तरी पूर्व जन्मींचा तो आमचा पिता आहे. त्यानें आमच्यावर अनंत उपकार केले आहेत, आणि आतां आम्ही त्याला क्रूरपणें कसें वागवावें ?"

आई म्हणाली, "काय तरी वेड्या मुली आहेत. आम्हीं जर त्यांचीं पिसें एकदम उपटून घेतलीं, तर त्यांत क्रूरपणा कसला ? पशुपक्षादिक प्राण्याला मनुष्यासारख्या वेदना बाधत नसतात. घोड्याला किंवा बैलाला चाबकांनीं मारलें असतां मनुष्यासारखी त्याला इजा होत नसते. यांची जर आम्ही पिसें काढून घेतलीं तर थोडक्या अवधींत त्याला पुनः पिसें फुटतील. आम्ही सर्व पिसें काढून घेतल्याबद्दल त्याला वाईट मुळींच वाटणार नाहीं. दाणापाणी देऊन चांगलें संगोपन करूं म्हणजे झालें."

परंतु मुलींचीं मनें आईच्या या उपदेशाला वळलीं नाहींत. त्यांनीं आपल्या पूर्वजन्मीच्या पित्याची यथायोग्य सेवा करण्याचा क्रम तसाच पुढें चालविला.

एके दिवशीं मुली बाहेर गेल्या होत्या. आई एकटीच घरांत होती. इतक्यांत हंस आला तेव्हां ती त्याला म्हणाली, "पूर्वजन्मींचा आमचा निराळा संबंध असल्याकारणानें माझ्या मुलीसमोर तुम्हापाशीं बोलण्याला मला लाज वाटते. पण आज तुम्ही अशा संधीला आलांत हें फार चांगलें झालें. मला तुमचें अंग जरा चांचपडून पाहूं द्याना."

हंस बिचारा रोजच्या जागेवरून खालीं येऊन बसला तेव्हां त्या कर्कश स्त्रीनें जवळ जाऊन त्याची मानगुटी धरली, व त्यांचीं सर्व पिसें लुबाडून घेतलीं. तो वेदनेनें व्याकूळ होऊन तेथेंच निचेष्टित पडला. या बाईनें तीं पिसें लपवून ठेविलीं. इतक्यांत मुली घरीं आल्या. त्यांनीं हंसाची ही दुर्दशा पाहून त्याला जवळ घेतलें, व म्हणाल्या, "तुमची ही दुर्दशा कां झाली ?"

हंस म्हणाला "तुमच्या आईला विचारा म्हणजे समजेल."

आईला विचारलें तेव्हां सर्व गोष्ट कळून आली. पुढें पिसें तपासून पहातात तों एक सोडून बाकी सर्व साधीं होतीं. तीं पक्व न झाल्यामुळें सोन्याचीं बनलीं नव्हतीं. या आईच्या कृत्याबद्दल मुलींना किती वाईट वाटत असेल याची कल्पनाच केली पाहिजे. त्यांनीं त्या हंसाचें चांगलें संगोपन केलें; परंतु नवीन पिसें फुटून उडण्याचें सामर्थ्य आल्याबरोबर तो तेथून हिमालयावर गेला, आणि तेथेंच कायम राहिला. इकडे मुलींना आणि त्यांच्या आईला भांडवलावर हल्ला केल्याबद्दल अत्यंत दुःख झालें.

http://dharmanandkosambi.com/index.php?option=com_content&view=category&layout=blog&id=79&Itemid=183&limitstart=66

story 67

## ५२. एकाला लांच दिला तर दुसरा देतो

(बब्बुजातक नं. १३७)

एका कालीं बोधिसत्त्व पाथरवटाच्या कुलांत जन्मला होता. वयांत आल्यावर तो आपल्या कुलकर्मानेंच उदरनिर्वाह करीत असे. काशीच्या राष्ट्रांत एका खेडेगांवीं एक मोठा सधन व्यापारी रहात असे. त्यानें हजारों सुवर्णकार्षापण जमिनींत गाडून ठेविले होते. कांहीं काळानें त्या कुटुंबांतील सर्व माणसें एकामागून एक मृत्युमुखीं पडलीं. श्रेष्ठीहि मरून गेला. त्याची बायको त्या द्रव्यस्नेहानें मरणोत्तर उंदरीण होऊन त्या द्रव्यावर बीळ करून राहिली. तो गांव त्या व्यापाऱ्यानेंच वसविला होता. त्याच्या कुटुंबाची ही दशा झाल्यावर गांवावर देखील तोच प्रसंग आला. सर्व गांव साफ ओस पडला. आमचा बोधिसत्त्व आपल्या निर्वाहासाठीं फिरत फिरत त्या ओसाड गांवाच्या जवळ दुसऱ्या एका खेडेगांवीं जाऊन राहिला. तो त्या व्यापाऱ्याच्या मोडक्या घराचे दगड वगैरे घेऊन ते साफसुफ करून दुसऱ्या लोकांना विकून त्यावर आपला निर्वाह करीत असे. उंदरिणीनें त्याला पाहून असा विचार केला कीं, हा मनुष्य फार गरीब दिसतो. दगड फोडून फोडून बिचारा कष्टी होत असतो. माझ्याजवळ असलेल्या या सोन्याच्या नाण्याचा मला कांहींच फायदा होत नाहीं. मी जर याला रोज एकेक कार्षापण दिला तर त्याला त्यापासून फार सुख होईल व तो मलादेखील मदत करू शकेल. असा विचार करून एक कार्षापण तोंडांत धरून ती बोधिसत्त्व दगड फोडीत होता त्या ठिकाणीं गेली. तिला पाहून बोधिसत्त्व म्हणाला, "उंदरीणबाई, तोंडांत सोन्याचें नाणें घेऊन तूं येथें कां आलीस ?" ती म्हणाली, "माझ्याजवळ बराच मोठा नाण्याचा संग्रह आहे. त्यांतून मी तुला रोज एकेक कार्षापण देत जाईन. त्या द्रव्यानें तूं आपल्या कुटुंबाचें पोषण कर व मला पोटापुरतें मांस आणून देत जा."

बोधिसत्त्वाला ही गोष्ट फारच पसंत पडली, व त्याप्रमाणें रोज एक कार्षापण घेऊन उंदरीला तो पोटभर मांस देऊं लागला. एके दिवशीं एका मुंगसानें त्या उंदरीवर हल्ला करून तिची मानगुटी धरली. बिचारी मरणभयानें गलित होऊन गेली. तिच्या तोंडांतून शब्द निघेना. तथापि, मोठ्या धैर्यानें अडखळत अडखळत ती मुंगुसाला म्हणाली, "बाबारे, मला खाऊन तुला काय फायदा होणार !"

मुंगूस म्हणाला, "हें काय विचारतेस ? आजच्या दिवसाचें माझें जेवण होणार आहे आणि याहून दुसरें मला काय पाहिजे आहे ?"

ती म्हणाली, "माझ्या शरिरांतून जेवढें मांस तुला आज मिळणार आहे तेवढें रोजच्या रोज मिळालें असतां तूं मला सोडून देशील काय ?"

मुंगूस म्हणाला, "यांत काय संशय. पण खोटें सांगून तूं जर पळून जाशील तर तुझा पुरा सूड उगवीन. बिळांत जाऊन दडून बसलीस तरीदेखील तूं माझ्या कचाट्यांतून बचावणार नाहींस. माझ्या या खरतर नखांनीं तुझ्या बिळाचा ठाव देखील मला खोदून टाकतां येईल, व असा प्रसंग आल्यास हाल हाल करून मी तुला ठार मारीन."

दीनवाण्या स्वरानें उंदरीण त्याला म्हणाली, "तात्या, माझ्यावर विश्वास तरी ठेवून पहाना. मी खोटें बोललें तर आणखी एक दोन दिवसांनीं तुम्ही माझा खुशाल प्राणा घ्या."

हा संवाद झाल्यावर मुंगुसानें त्याला सोडून दिलें व त्या दिवसापुरती दुसरी कांहीं शिकार साधून आपला निर्वाह केला. पण दुसऱ्या दिवशीं माघ्यान्हसमय होण्यापूर्वीच तो उंदरीणबाईच्या बिळाजवळ हजर झाला. बोधिसत्त्वानें सकाळीं आणून दिलेल्या मांसांतील एक भाग देऊन उंदरीनें त्याला संतुष्ट केलें. हा प्रकार बरेच दिवस चालला, तेव्हां दुसऱ्या एका मुंगुसाला हें वर्तमान समजलें व त्यानें उंदरीवर झडप घातली. त्याला देखील मांसाचा वाटा देण्याचें अभिवचन देऊन उंदरीनें आपली सुटका करून घेतली. त्यानें ही गोष्ट आपल्या मित्राला सांगितली तेव्हां त्यानें उंदरीणबाईला पकडण्याची पहिली संधि साधून घेतली, व आपल्याला मांसाचा वाटा देण्याची कबुली घेऊन सोडून दिलें. याप्रमाणें क्रमानें चार मुंगूस उंदरीणबाईच्या मांसाचे वाटेकरी झाले. बोधिसत्त्वानें आणलेलें सर्व मांस त्यांना देऊन बिचाऱ्या उंदरीला अरण्यांतील फलमूलांवर आपली उपजीविका करणें भाग पडलें. ती दिवसेंदिवस अशक्त होत चालली. तें पाहून एके दिवशीं बोधिसत्त्व तिला म्हणाला, "बाई

तूं इतकी रोड कां दिसतेस ? तुला कांहीं आजार झाला नाहीं ना ? मला जर तुझ्या दुर्बलतेचें कारण समजेल तर मी त्यावर माझ्या हांतून होईल तेवढा उपाय करण्यास कसून करणार नाहीं."

ती म्हणाली, "तात्या, मला दुसरा कोणताही रोग नाहीं; परंतु तुम्ही आणून दिलेलें मांस माझ्या पोटांत जात नसून शत्रूंच्या पचनीं पडतें. त्यामुळें वन्य पदार्थांवर मोठ्या मुष्किलीनें मला कसा बसा जीव धरून रहावें लागतें. शत्रूवर रोंज नजर पडल्यामुळें माझी मानसिक व्यथा वाढत जाऊन तिचा परिणाम देहावर देखील घडून आला आहे."

बोधिसत्त्व म्हणाला, "असे तुझे शत्रू तरी कोण ? त्याची मला तूं इतके दिवस खबर कां दिली नाहींस ?"

तिनें घडलेलें सर्व वर्तमान बोधिसत्त्वाला सांगितलें. तेव्हां तो म्हणाला, "या दुष्ट मुंगुसांचा मी ताबडतोब बंदोबस्त करितों. तूं कांहीं भिऊं नकोस. शत्रूंला लांच देऊन मित्र करूं पहाणें ही मोठी चूक होय. अशी जी म्हण आहे तिचा प्रस्तुत प्रकरणीं प्रत्यक्ष अनुभव येत आहे. एका मुंगुसाला तूं लांचानें वळविण्याचा प्रयत्न केलास त्यामुळें तुझ्यावर उपाशीं मरण्याची पाळी आली. आतां या सर्वांचा बंदोबस्त होईपर्यंत मी तुला थोडें अधिक मांस देत जाईन. त्यावर तूं आपला निर्वाह कर, व त्यांनाहि संतुष्ट ठेव. मी त्यावर कांहीं उपाय योजणार आहें अशी त्यांस शंका येऊं देऊं नकोस."

उंदरीण म्हणाली, "पण तात्या, तुम्ही यांचा बंदोबस्त कसा करणार ? हे मुंगूस म्हटले म्हणजे असे लबाड असतात कीं, ते माणसाच्या वाऱ्याला देखील उभे रहावयाचे नाहींत मग तुम्हाला ते कसे पकडतां येतील ?"

बोधिसत्त्व म्हणाला, "बाई त्याबद्दल तूं काळजी करूं नकोस. कांहीं दिवस दम धर व मी काय करतों तें पहा."

बोधिसत्त्वानें त्या बिळाच्या आसपास पडलेले मोठमोठाले दगड तासून त्यांची एक सुंदर गुहा बनविली व तिला काचेचा जाड दरवाजा बसवून तो उंदरीला म्हणाला, "बाई, मी तुझ्या अन्नापाण्याची या गुहेंतच व्यवस्था करतों. तूं स्वस्थ आंत बसून रहा व मुंगूस तुझ्याजवळ मांस मागावयास आले तर दरवाज्याच्या आंतून यथेच्छ शिव्या दे. ते तुला एक केसहि वाकवूं शकणार नाहीं हें पक्कें ध्यानांत ठेव."

बोधिसत्त्वाच्या सांगण्याप्रमाणें उंदरीण मुंगुसांची वाट पहात गुहेच्या दरवाजाच्या आंत बूसन राहिली. इतक्यांत नियमाप्रमाणें पहिला मुंगूस येऊन आपला हिस्सा मागूं लागला, तेव्हां ती त्याला म्हणाली, "मुर्खा, माझ्याजवळ तुझ्या बापानें ठेव ठेवण्यास दिली आहे काय ? नीचा, तुला जर मांस पाहिजे असेल तर आपल्या पोरांला मारून खा."

उंदरीचें असलें अपमानकारक भाषण ऐकून मुंगूस अत्यंत संतप्त झाला. त्याचा कोप गगनांत मावेना. दरवाजा खुला आहे असें वाटून त्यानें एकदम तिच्यावर उडी टाकली. पण आड आलेल्या जाड आरशावर तो आदळला, व उरःस्फोट होऊन तेथेंच मरण पावला. त्याच्या जातभाईंनीं मांसाची मागणी केल्याबरोबर उंदरीनें त्यावर शिव्यांची लाखोली वाहिली व ते देखील क्रोधानें संतप्त होऊन गुहेच्या दरवाजावर आदळून मरण पावले. तेव्हांपासून उंदरीची बोधिसत्त्वावर विशेष मर्जी बसली, व जवळ असलेला सर्व ठेवा तिनें त्याच्या स्वाधीन केला. बोधिसत्त्वानेंहि यावज्जीव तिचा मोठ्या ममतेनें संभाळ केला.

## ५३. दांभिक तपस्वी.

(गोधजातक नं.१३८)

एका काळीं बोधिसत्त्व घोरपडीच्या कुळांत जन्मला होता. तो एका गांवाजवळ अरण्यांत एक मोठें बीळ पाडून त्यांत रहात असे. त्याच्या बिळाजवळ एक उत्तम तपस्वी पर्णकुटिका बांधून रहात असे. त्याच्या दर्शनाला आसपासच्या गांवांतून पुष्कळ लोक येत असत. आमचा बोधिसत्त्व देखील त्याच्या दर्शनाला दिवसांतून दोन तीन वेळा जात असे व त्याचा धर्मोपदेश ऐकत असे. कांहीं कालानें तो तपस्वी मरण पावला; व त्याच्या जागीं दुसरा एक तपस्वी येऊन त्याच पर्णकुटिकेंत राहूं लागला. याहि तपस्व्याचा उपदेश ऐकण्यासाठीं बोधिसत्त्व वारंवार जात असे.

एका उन्हाळ्यांत अकालवृष्टि झाली व तिजमुळें वारुळांतून पुष्कळशा माशा बाहेर पडल्या. त्या खाण्यासाठीं घोरपडी जिकडे तिकडे हिंडू लागल्या. ग्रामवासी मनुष्यांनीं कांहीं घोरपडी पकडून त्यांच्या मांसावर आपली चैन चालविली. या नवीन आलेल्या तपस्व्याला देखील घोरपडीचें मांस लोकांनीं खाऊं घातलें. तें त्याला फारच आवडलें, व तें कोणच्या प्राण्याचें मास आहे याची त्यानें चौकशी केली. पण दोन चार दिवसांनीं घोरपडीचें मांस मिळेनासें झालें. तपस्व्याला त्या मांसाची एक प्रकारची फारच चटक लागली. त्याला चैन पडेना. तेव्हां आपल्याजवळ धर्मोपदेशक ऐकण्यासाठीं येणाऱ्या घोरपडीचा वध करून दोन दिवस चैन करावी असा त्यानें बेत केला; व गांवांतून मांस शिजविण्यासाठीं भांडें, मीठ, तूप, मसाला वगैरे पदार्थ आणवून आपल्या पर्णकुटिकेंत तयार ठेविले, आणि एक दांडकें काखेंत आपल्या भगव्या वस्त्राखालीं लपवून बोधिसत्त्वाची मार्गप्रतिक्षा करीत मोठ्या गंभीर मुद्रेनें तो पर्णशाळेच्या दाराशीं बसला. सुदैवानें वारा तो बसला होता तिकडून येत असे. जवळ आल्याबरोबर बोधिसत्त्वाला त्याची फाजील गंभीर मुद्रा पाहून एक प्रकारचा संशय आला. इतक्यांत वारा येऊन त्याबरोबर घोरपडीच्या मांसाचा त्याला वास आला. तेव्हां तपस्व्यानें घोरपडीचें मांस खाल्याबद्दल त्याची पक्की खात्री झाली, व त्यानें तपस्व्याला दुरूनच नमसकार केला. तापसानें आपल्याजवळ येण्याविषयीं त्याला पुष्कळ आग्रह केला परंतु अनेक कारणें सांगून बोधिसत्त्वानें जवळ जाण्याचें नाकारलें. तेव्हां आतां हातची शिकार जाते असें वाटून तपस्व्यानें आपलें दांडकें बोधिसत्त्वावर फेंकलें. त्याच्या शेपटीला तेवढा थोडासा धक्का लागला. बाकी कांही इजा झाली नाहीं. तो दूर उभा राहून म्हणाला, "अरे ढोंग्या, या तुझ्या जटा,

अजिनचर्म आणि भगवीं वस्त्रें घेऊन काय करावयाचीं ! तुझें अंतःकरण इतकें वाईट आहे कीं, या सर्व पदार्थांनी तें परिशुद्ध होण्याचा संभव नाहीं. बाहेरून तुझा डामडौल पाहून बिचारे भोळे लोक मात्र फसत आहेत !" असें बोलून बोधिसत्त्व तें बीळ सोडून घोर अरण्यांत निघून गेला.

५४. फळ हातीं आल्यावाचून बोभाटा करूं नये.

(उभतोभट्ट जातक नं. १३९)

एका गांवीं एक कोळी रहात असे. तो जवळच्या नदींत गळ घालून मासे पकडून आपला निर्वाह करी. एके दिवशीं आपल्या मुलाला बरोबर घेऊन मासे धरण्यासाठीं तो नदीवर गेला. तेथें त्यानें एका डोहांत गळ टाकल्याबरोबर तो खालीं पाण्यांत कशाला तरी अडकला, व वर काढतां येईना. कोळयाला वाटलें कीं, गळाला मोठा मासा लागला असावा. मासा हातीं येण्याची वाट न पहातां आपल्या मुलाला पाठवून आपणाला मोठा मांसा सांपडणार आहे ही बातमी त्यानें आपल्या बायकोला कळविली. ती मुलानें आणलेली बातमी ऐकून त्या बाईला फार आनंद झाला. परंतु एवढा मोठा मासा घरीं आणल्याबरोबरच शेजारीपाजारी त्याचा वाटा मागतील ही गोष्ट तिला मुळींच आवडली नाहीं. कांहीं तरी युक्ति योजून ताबडतोब शेजाऱ्या पाजाऱ्याशीं भांडण उकरून काढणें तिला इष्ट वाटलें, व त्याप्रमाणें एक ताडपत्र नेसून एका डोळयांत काजळ घालून व कुत्र्याला कडेवर घेंऊन ती आपल्या शेजारच्या घरीं गेली.

शेजारीणबाई म्हणाली, "कायग बाई, लुगड्यावरून हें ताडपत्र काय नेसली आहेस ! आणि कुत्र्याला कडेवर घेऊन या विचित्र वेषानें काय हिंडत आहेस ? तुला वेड तर लागलें नाहीं ना ? तेव्हां ती चवताळून जाऊन व शिव्यांची लाखोली वाहून शेजारीणबाईला म्हणाली, "थांबा, मला वेडी म्हटल्याबद्दल तुझ्यावर मी फिर्याद लावतें." दुसऱ्या कांहीं बायाहि तेथें जमल्या व त्या सर्वांनीं आपणास वेडें म्हटल्याबद्दल कोळयाच्या बायकानें गांवच्या वहिवाटदारापाशीं फिर्याद नेली.

इकडे माशाला वर ओढतां येईना म्हणून आपलें धोतर व पांघरूण नदीच्या कांठावर ठेऊन कोळयानें केवळ लंगोटी नेसन डोहांत उडी टाकली, व गळाच्या दोरीला धरून माशाचा थांग लावण्यासाठीं तळाला बुडी मारली. तो गळ डोहांत बुडलेल्या एका झाडाच्या बुंध्याला जाऊन अडकला होता. कोळी मासा समजून त्याला मिठी मारण्यास गेला, तों त्या बुंध्याचें एक मूळ त्याच्या डोळयांत शिरून डोळा साफ फुटला. त्या वेदनेनें तळमळत कोळी काठावर आला आणि

पहातो तों धोतर कोणीतरी चोरानें लांबवलेलें ! आतां दुसरा कांही उपाय नाहीं असें जाणून एका हातानें आपला डोळा दाबून त्यानें तेथून घरचा रस्ता सुधारला. घरीं बायको दिसेना. मुलाला विचारलें असतां ती शेजाऱ्यावर फिर्याद करण्यासाठीं गांवच्या वहिवाटदाराच्या कचेरींत गेली आहे असें समजलें. तेव्हां डोळयाला पट्टी बांधून व दुसरें जुनेंपुराणें धोतर नेसून तो कचेरीकडे धांवला. तेथे खटल्याचा निकाल होऊन याच्या बायकोलाच गुन्हेगार ठरविण्यांत आले होतें, व दंडाची रक्कम दिल्यावाचून चौकीवरून तिला सोडूं नये असा वहिवाटदारानें हुकूम फर्मावला होता.

आमचा बोधिसत्त्व त्या कालीं त्या गांवांत वृक्षदेवता होऊन रहात असे. हें सर्व प्रकरण पाहून तो त्या कोळयाला म्हणाला, "बाबारे, वस्तु हातीं आल्याशिवाय बोभाटा केल्याचें हें फळ आहे. तुझा पाण्यांतला प्रयत्न फसला आहे; व जमिनीवर आल्यावर तुझ्या बोभाट्यानें काय परिणाम घडून आला हें तुला दिसून येतच आहे.* तुझ्या या उदाहरणानें वस्तु हातीं आल्याशिवाय बोभाटा न करण्याचा धडा लोकांनीं शिकला पाहिजे."

------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

* मुळ गाथा --

अक्खी भिन्नो पटो नट्ठो सखिगेहेच भंडनं।

उभतो पदुट्ठो कम्मन्तो उदकम्हि थलम्हिच ॥

------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

५५. एकाच्या पापाचें फळ सर्व जातभाईंनां भोगावें लागतें.

(काकजातक नं. १४०)

एकदां बोधिसत्त्व कावळयाच्या योनींत जन्मला होता व मोठ्या समुदायासहवर्तमान तो वाराणसीच्या जवळपास रहात होता. एके दिवशीं वाराणसी राजाचा पुरोहित नदीवरून स्नान करून येत होता. वाटेंत नगरद्वाराजवळ तोरणावर दोन कावळे बसले होते. त्यांतील एकजण दुसऱ्याला म्हणाला, "हा पहा, दुष्ट ब्राह्मण उघड्या बोडक्यानीं येत आहे. मला वाटतें कीं, तो या तोरणाच्या खालीं आल्याबरोबर त्याच्या डोक्यावर देहधर्म करावा !"

दुसरा म्हणाला, "बाबारे, असली भलतीच कुकल्पना करूं नकोस. हा ब्राह्मण सामान्य मनुष्य नसून राजाचा पुरोहित आहे. याचाशीं वैर संपादन करणें म्हणजे आपल्या हातानेंच आपला गळा कापून घेण्यासारखें आहे."

पहिला कावळा म्हणाला, "तुझे हे नुसते कुतर्क आहेत. राजाचा पुरोहित झाला काय किंवा त्याचा बाप झाला काय, आमच्यासारखा उडत्या पाखराचें तो काय करणार ? तुला जर भीति वाटत असेल तर तूं येथून खुशाल पळून जा ! पण मी याच्या गुळगुळीत डोळयावर देहधर्म केल्यावांचून येथून निघून जाणार नाहीं."

त्या दुसऱ्या कावळयानें आपल्या मित्रास उपदेश करण्यांत तथ्य नाहीं असें जाणून तेथून पलायन केले; परंतु शिल्लक राहिलेल्यानें ब्राह्मण तोरणाखालीं आल्याबरोबर त्याच्या डोक्यावर देहधर्म केला ! डोक्यावर एकदम काय पडलें हें पाहण्यासाठीं ब्राह्मणानें वर मान केली. तों का का शब्द करीत वेडें वाकडें तोंड करून जणूं काय याची थट्टाच करीत आहे असा एक कावळा तोरणावर बसलेला याच्या पहाण्यांत आला. आपला अपमान कसाबसा गिळून डोकें धुवून तो आपल्या घरीं

आला; परंतु कावळयाविषयी त्याच्या मनांत अत्यंत द्वेषबुद्धि उद्भवली, व सर्व कावळयांचा सूड उगविण्याचा त्यानें निश्चय केला.

एके दिवशीं राजाची एक दासी तांदूळ सडण्याच्या कामांत गुंतली असतां थकून जाऊन तेथेंच झोपीं गेली. इतक्यांत एक एडका येऊन तांदुळ खाऊं लागला. जागी होऊन तिनें त्या एडक्याला घालवून दिलें; परंतु तो तांदुळाला इतका लंपट झाला होता कीं, तिची नजर चुकवून त्यानें तांदूळ खाण्याचा आपला क्रम सोडला नाहीं. दासीला त्याचा अत्यंत संताप आला. तिनें स्वयंपाकघरांतून एक जळकें कोलीत आणून एडक्याला न दिसेल अशा ठिकाणीं दडवून ठेविलें, व तो तांदुळ खाण्यास आल्याबरोबर त्याच्यावर प्रहार केला, जळके निखारे अंगावर पडून एडक्याच्या लोकरीनें पेट घेतला, आणि तो आपल्या रक्षणासाठीं इतस्ततः धावूं लागला. जवळच एक राजाच्या हत्तींची पागा होती. व तेथें एक मोठी गवताची गंजी होती. एडका आगीच्या त्रासानें त्या गंजीत शिरला; आणि त्यामुळें ती गंजी देखील पेटली. गंजीची आग पागेवर पडून पागेनें पेट घेतला. हत्तीच्या माहुतांनीं हत्तीचीं बंधनें तोडून त्यांना मोकळें केलें; तथापि कांहीं हत्तींना कातडी भाजल्यामुळें जखमा झाल्या. हें वर्तमान राजाला समजल्यावर राजानें जळलेल्या हत्तीस काय उपाय करावा असा आपल्या पुरोहितास प्रश्न विचारला. तेव्हां तो म्हणाला, "महाराज, कावळयाची वसा मिळाली असतां हत्तीच्या जखमा लवकर बऱ्या होतील."

राजानें कावळयांला मारून चरबी गोंळा करावी असा हुकूम दिला. जो तो धनुष्यबाण घेऊन कावळयांच्या मागें लागला, व हजारों कावळे प्राणास मुकले ! तेव्हां शिल्लक राहिलेल्या कावळयांना मोठें भय उत्पन्न झालें, व ते सर्वजण बोधिसत्त्वाला शरण गेले. बोधिसत्त्व म्हणाला, "आमच्या एका जातभाईच्या दुराचरणाचें हें फळ आम्हीं भोगीत आहोंत ! राजाच्या पुरोहिताचा जर त्यानें अपमान केला नसता तर आज सर्व कावळयांवर हा प्रसंग गुदरला नसता. आतां मी माझा जीव धोक्यांत घालून देखील या संकटाचें निरसन होईल तर पहातों."

असें बोलून तो तेथून उडाला आणि एका खिडकींतून राजसभेंत शिरून राजाच्या सिंहासनाखालीं जाऊन बसला. त्याला पकडण्यासाठीं राजाचे दूत धांवले. पण त्यांना राजा

म्हणाला, "माझ्या सिंहासनाचा ज्यानें आश्रय केला त्याच्यावर हल्ला करूं नका. मीं त्याला अभय दिलें आहे."

हे राजाचे शब्द कानीं पडतांच बोधिसत्त्व सिंहासनाखालून बाहेर आला. आणि राजाला नमस्कार करून म्हणाला, "महाराज, मला एकट्याला आपण अभय दिलें आहे. परंतु माझ्या हजारों ज्ञातिबांधवांची आपल्या आज्ञेनें हानि होत आहे. पुष्कळजण मृत्युमुखीं पडले आहेत, व आम्ही जिवंत असलेले त्यांच्या शोकानें कष्टी झालों आहों."

राजा म्हणाला, "आमच्या पुरोहितानें कावळयाच्या वसेनें हत्ती बरे होतील असें सांगितल्यामुळें मी हा हुकूम सोडला."

बोधिसत्त्व म्हणाला, "महाराज, आपल्या पुरोहितानें सूड उगविण्याच्या बुद्धीनें ही गोष्ट आपणास सांगितली. कावळयाच्या पोटांत वसा कोठून असणार ? राजा म्हणाला, "सर्व प्राण्यांच्या मांसांत वसा सांपडते. तर मग कावळयाच्या मांसात ती कां नसावी ?"

बोधिसत्त्व म्हणाला, "महाराज, आमची कावळयाची जात मोठी भित्री आहे. सर्व लोकांविषयीं ते साशंक असतात, व त्यामुळें त्यांच्या मांसांत वसा वाढूं शकत नाहीं."

हें बोधिसत्त्वाचें भाषण ऐकून राजा प्रसन्न झाला, व म्हणाला, "मीं आजपासून सर्व कावळयांना अभयदान देतों."

एवढ्यानें बोधिसत्त्वाची तृप्ति झाली नाहीं. त्यानें सर्व प्राण्यांला राजापासून अभयदान मागून घेतलें व तो म्हणाला, "महाराज छंदानें, द्वेषानें, भयानें किंवा मोहानें कोणतेंही कृत्य करीत जाऊं नका. कोणत्याहि कृत्याला आरंभ करण्यापूर्वी नीट विचार करा; कांकीं तुमच्या हातून चूक घडली तर पुष्कळांचें अकल्याण होणार आहे."

तेव्हांपासून राजा मोठा धार्मिक झाला, व कावळयाला रोजचा पुष्कळ भात खावयास द्यावा असा त्यानें हुकूम केला.